गद्यपद्यात्मक

संगीत चंद्रकला नाटक.

अंक १ ते ५.

हें पुस्तक

त्रिंबक आपाजी भोंजाळे

उर्फ तात्याबा पुणेंकर याणीं तयार करून

सर्व हक्कासुद्धां

रंगो रामचंद्र सोळंकर,

ग्रंथवर्धक प्रेसाचे मालक यांस नजर केलें असे

तें त्याणीं

पुणें, गोसावीपुरा येथें "अंबाप्रसाद" छापखान्यांत

छापून प्रसिद्ध केलें.

सन १८८७.

किंमत १। रुपया.

गद्यपद्यात्मक

संगीत चंद्रकला नाटक.

अंक १ ते ५.

हें पुस्तक

त्रिंबक आपाजी भोंजाळे

उर्फ तात्याबा पुणेंकर याणीं तयार करून

सर्व हक्कासुद्धां

रंगो रामचंद्र सोळंकर,

ग्रंथवर्धक प्रेसाचे मालक यांस नजर केलें असे

तें त्याणीं

पुणें, गोसावीपुरा येथें "अंबाप्रसाद" छापखान्यांत

छापून प्रसिद्ध केलें.

सन १८८७.

किंमत १। रुपया.

रा. रा. रंगो रामचंद्र सोळंकर

यांचा अलौकिक स्नेहभाव

जाणून हें पुस्तक

त्यांस नजर केलें

असे.

तात्याबा

पुणेंकर.

प्रस्तावना.

कैलासवासी **अण्णासाहेब किर्लोसकर** यानीं तर नाटकाची दिशाच फिरवून दिली. नाटककारानीं रंगभूमीवर धांगडधिंगा घालावा व लोकांनीं घरीं जाऊन तो तमाशा वर्णन करावा, हें जाऊन मृदू व कोमल शब्दानीं युक्त अशा संगितानें ज्याच्या त्याच्या तोंडी वास केला.

मला वाटते हीच नाटकाची परमावधी झाली. अ-ासाहेबानीं सर्व कांहीं करून टाकले आहे. लो-ांची रुची येथेंच कायम होणार व तेंच आपल्याला ष्ट आहे. परंतु ती लोकांची रुची कायम कशी र-णार. रोज तीच तीच नाटकें ऐकणें व पहाणें व च तींच पदें गात बसणें यांत लोकांना कंटाळा येत सेल. हीं गोष्ट लक्षांत आणून मी या लोकांच्या चीला कांहीं तरी पोषण द्यावें म्हणून यथाशक्ती हा त्न केला आहे. हा माझा पहिलाच प्रसंग आहे. री लोकांचे उपयोगी पडावें ही माझी इच्छा पाहून चक या संगीत पोषक वस्तूचा स्विकारच करतील.

या नाटकांत सहजासहजी प्रितीचा काय प्रभाव ाहे तोहीं दिसून येईल. स्त्रियांच्या दृढ निश्चयाचा ासला दृष्टीस पडेल व त्याचप्रमाणें पुरुषांची मदनश-

रानें काय अवस्था होते याचेही थोडकेसें चित्र दृष्टीस पडेल. सारांष शृंगाराच्या भोक्त्यास शृंगार मिळून संगिताच्या भोक्त्याचेंही काम व्हावे. हाच माझा हें नाटक लिहिण्याचा मुख्य उद्देश आहे. तो साधला न साधला ते पहाण्याचे वाचक जनावर मी सोंपवितों.

तात्याबा पुणेंकर,

पुस्तक कर्ता.

संगीत चंद्रकला नाटक.

पद.

(नोहे नारी ही चंचलवल्ली.)

नमुनी गिरिजाधव मदनारी तो ॥ अघनग संव्हारि तो ॥ ध्यान मान करी देत सुमति मन भ्रांत शांत सुखदायक प्रभु तो ॥ ध्रु० ॥ स्वांगी संगीतारंगी राया ॥ इंगित पुरवाया ॥ शृंगी भृंगीसह भृंगी प्याया ॥ सुसंगित न्हाया ॥ संगी वामांगी हिमनगतनया ॥ गंगा आदिमाया ॥ गानान्वित सुम गुच्छ सुजन करि अर्पाया ये त्र्यंबक स्तवितो ॥ १ ॥

पद.

(तुझा तो शंकर सुखकर हो.)

ज्यातें सकलही सुर नमिती ॥ जगद्व्यापक, नतविमोचक, जन्मला, सत्कुला, पावला, धावला, वंदिला, सर्वसाक्षी तुला ध्याती ॥ ध्रु० ॥ द्वैत-खंडन दुष्ट-दंडन मंडनी ॥ आर्या, कार्या, सदया, पालिसी दिननिशी ॥ श्रेष्ठ वदती जगीं ज्याशी ॥ जाहला सुखकर सकल जनाशी ॥ वांझ माहिषी दुग्धदानी ॥

शूद्र वदनीं वेदवाणी ॥ वर्तलाशी दंडपाणी ॥
देईं मति बा दत्तमूर्ति ॥ सक० ॥ १ ॥

सूत्रधार—अहो! सकल जगतोपदेशतेचें गुरुत्व धारण करणार देवाधिदेवा, आपली लीला विपरीत सुखदाती आहे. जेव्हां भक्तहृदयाब्जीं भक्तिआसक्तेचा मकरंद उत्पन्न होतो, तेव्हां आपण दयारूप मृगांकानें त्यास विकसित करून, उपदेशभृंगानें मधु सेवून, आपल्या स्वरूपीं मिळवितां, तर मी ह्या कालीं जो स्तव केला त्यास मान देऊन या उत्सवास सादर व्हावें. (इकडे तिकडे फिरून) अरे, पण प्रियेचें अनुमोदन घेतल्यावांचून कार्य होणार नाहीं. कारण, सर्व तयारी करणें तिजकडे आहे. (पडद्याकडे पाहून) सखे, क्षणभर बाहेर ये बरें.

नटी—(प्रवेश करून) ही मी आलें. काय आज्ञा होत आहे?

सूत्रधार—शाबास! गृहिणी असावी तर तुझ्यासारखीच! नाहीं तर काय उपयोग!

नटी—जिवलगा, पतिव्रताधर्म असाच आहे. यांत नवल तें काय! परंतु—

श्लोक.

(भुजंगप्रयात वृत्त.)

सभा शोभते लोकपालादिकांची ॥
तशी भासते मंडळी प्राज्ञ साची ॥
तया बाहिलें कोणत्या काजिं नाथा ॥

कथा दीनदासी नमीं पाईं माथा ॥ १ ॥

सूत्रधार—सांगतों ऐक, आज माझ्या मनांत असें वाटतें.

साकी.

बुधजनमन अति उत्सुक जाणुनी उपाय आजि हा सुचला ॥ परिपूरित शृंगाराचा जो चंद्रकला सुमझेला ॥ अर्पूं सुखवाया ॥ करिं श्रम पात्रें सजवाया ॥ १ ॥

या कामीं तुझें अनुमोदन आहे ना ?

नटी—हें काय विचारावं ! पतिहेतुविरहित स्त्रियांनीं वर्तन केलं असतां महादोष आहे, परंतु ह्या आपल्या वर्तनाला ह्मणावं तरी काय ?

सूत्रधार—कोणतें बरें गैरवर्तन झालें सांग पाहूं ?

नटी—महाराज, क्षमा असावी, मी अपराधी आहें.

सूत्रधार—कशानें ?

नटी—आहो. या रंगभूमीवर आल्यापासून माझी वृत्ती बदलली म्हणूंन असे शब्द निघाले.

सूत्रधार—सांग बरें, तुझी वृत्ति कशी झाली ती.

नटी—ऐका तर—

श्लोक.

(स्रग्धरा वृत्त.)

स्वामीनाथा मनाला बहु सुख गमतें पाहुनी रंगभूमी ॥ मत्स्या जेवीं उदासी उदकाविण

तशी जाहलें बद्ध कामीं ॥ आहा शारद्दतूचा निशि समय कसा जातसें व्यर्थ वांया ॥ अं-गीकारा दिनासी किति तरि विनवूं पाहती प्राण जाया ॥ १ ॥

सूत्रधार—सखे, ह्या योगें मात्र माझें मन शांत झालें; आणि—

दिंडी.

लीनताही पाहुनी मन्मनातें ॥ भाग्यवानचि जाणतों या महीतें ॥ पुरुष युवतीचें ऐक्य जरी राही ॥ सौख्य संसारीं तयापरी नाहीं ॥ १ ॥

नटी—या चरणाचा आश्रय घडला म्हणून मी सदो-दित आनंद मानतें.

सूत्रधार—असो, क्षणभर तुझें गायन श्रवण करावें अशी इच्छा आहे.

नटी—जशी महाराजांची आज्ञा.

पद.

(सुटला पितृदिशेचा वारा.)

ऋतु वसंत शोभे हें वन ॥ पंकजीं भृंग राहति गुंगुन ॥ सुखि अम्रासव सेवून कोकिला बोले ॥ शुक रावे मंजुल शब्दें घेती झोले ॥ १ ॥ पुच्छ पसरुनी नाचती मोर ॥ मोरिसह हर्षें करिति शृं-गार ॥ नानाविध तरुवर सुंदर पल्लव फुलले ॥ किति पक्वापक्व फलयुत नम्रचि झाले ॥२॥ कु-समतरु जाई जुई सेवंती ॥ मोगरा बकुल कुंद

मालती ॥ चमेली गुलाब चंपक अती ॥ इवरुन गेले॥कारि शांत गंध परि अनंग मारी भाले॥३॥

तर त्या कामाच्या तापाची शांति होण्याकरितां हे स्थल उत्तम आहे.

सूत्रधार--(पडद्याकडे पाहून) प्रिये पाहिलैंना !

साकी.

तवगानध्वनि श्रवणीं पडतां कामोद्दीपन झालें ॥ चंद्रकांत नृप सुख सेवाया या उद्यानीं आले ॥ जावूं चल आतां ॥ कार्यीं ठेवीं तत्परता ॥ १ ॥

(उभयतां निघून जातात.)

(इतक्यांत चंद्रकांत राजपुत्र प्रवेश करतो.)

चंद्रकांत—अहा हा !

पद.

(ठाऊंक मजला असें ऋषीचें.)

हा सुखकर बघुनी अराम मन्मनीं तोष बहू जाहला ॥ कुसुमतरु भिन्नाकृती स्वाशिक मंद वात सूटला ॥ सुमनें विखुरलीं ठायीं ठायीं जी शेज भासते मला ॥ सारंगाचा वृंद कमलरस प्याया कीं धावला ॥ गुंजारव कंजावरि करिती मंजुल ध्वनिं गुंगला ॥ अम्रासव सेवुनिया श्रवणीं सुख देती कोकिला ॥ १ ॥

अशा आनंदकारक स्थानीं आल्यावांचून मनाला शांति होत नाहीं. त्यांतून हीं स्थानें आह्मासारख्या

वैभवयुक्त पुरुषांना सुख भोगण्याकरितां असलींच पाहिजेत. कारण, राज्यव्यवस्थेचे परिश्रम आणि उष्णताप ह्या दोहोंची शांति होण्याला हें सर्व वस्तूंनीं युक्त आहे. पहा !

श्लोक.

(स्रग्धरावृत्त.)

वाळ्याच्या थोर जाळ्या बहुत उभविल्या भोंवतीं जागजागीं ॥ पुष्पामोदोदकानें परिपुरित दिसे कुंड हें अग्रभागीं ॥ कारंजें त्यामधोनी उडत चहुंकडे पार ना नीरधारा॥वाटे स्वर्गांत जैसे विबुधवन तया लाजवी भाग सारा ॥१॥

अशा उपवनांत कोणाला बरें आंनद होणार नाहीं! हे मयुरकोकिलादि पक्षी मोठ्या आनंदानें क्रीडा करितात (त्यांच्याकडे पहात स्तब्ध राहतों व श्वास टाकून) अहा! त्या पशुपक्ष्यांनासुद्धां विलास करावेसे वाटतात! आणि ईश्वरानें त्यांच्या सुखाकरितां सर्व वस्तु प्रयत्न न करितां मिळाव्यात अशी तजवीज करून ठेविली आहे. यांत सुद्धां स्त्रीपुरुषांचा जोडा आहेच. तसेंच—

अंजनीगीत.

अम्रतरूतें वेली अलिंगन ॥ नवयौवनभर कुसुमें करुन ॥ प्रेमभरें डोलति तें पाहुन ॥ तोष मनीं वाटे ॥ १ ॥ मंदमंद वायूच्या लहरी ॥ कुसुमगंधयुत मोहक भारी ॥ कामानल

माझ्या याशरिरीं ॥ फारच दुखवितो ॥ २ ॥

देवा, मी असा तुझा कोणता अपराध केला, कीं मजला अद्याप स्त्री नाहीं? अरे, ही माझी नूतन विलासाची इच्छा दग्ध झाल्यावर मग स्त्री मिळून काय उपयोग? नगरांतील नवयौवनभरानें युक्त अशा भामिनी पाहून मन अगदीं वेड्यासारखें होऊन जातें, तशांतून मी अद्याप ह्या सुखाचा अनुभवसुद्धां घेतला नाहीं तोंच हा मदन मला इतका त्रास देतो. तर पुढें काय परिणाम होईल कोण जाणे. हे मदना, तूं किती दुर्धर आहेस?

पद.

(ब्राह्मण कन्या नव्हे खरी.)

महा पराक्रमी वीर धनुर्धर ऐसा जरि पाहिला ॥ तयातें सेवक करि आपुला ॥ इंद्र चंद्र विधी जगीं मान्यपरी दाविशी त्या दाखला ॥ विष्णू स्मशानांत राहिला ॥ भिल्लिणि प्राप्ती लागि शिवानें हठयोग साधिला ॥ शेवटीं उमा वचनिं गोविला ॥ १ ॥

अशी जर तुझी सहाजिक कृती, तर आमच्या सारख्याचा काय पाड आहे? म्हणून तुला अनंत नमस्कार असोत. परंतु—

पद.

(कांते फार तुला मजसाठीं.)

होवो प्राप्त सखी मजलागीं बहु विषयें छ-

ळिलें ॥ व्यर्थ असुनि हा आनंदोत्सव स्त्री-
विरहित सुख हिनतें झालें ॥ ध्रु० ॥ जरि ब-
सली असली विधिग्रंथी ॥ नियम नये कवणा
टाळितां ॥ कोठवरी धिर ठेवूं देहीं ॥ नष्ट
पहा सर्वहि बल झालें ॥ हो० ॥ १ ॥

अशा कारणामुळें मजला फार त्रास होतो. रा-
जदरबारींचा विचार सुटला, विद्या शिकावयाचा
मार्ग बंद केला. साधुसंतांच्या पुजेंत निमग्न अ-
सतां, आज त्या माझ्या बुद्धीला भ्रम झाला ना? हर
हर! एक्या स्त्रीवस्तूवांचून सर्व जगत् तुच्छ
असें भासूं लागलें. जसें—

साकी.

वृक्ष लता पल्लवसुमयुत तृण धान्यें सुंदर महि
हीं ॥ मेघें मोदित होई परि नच बिंदू चातक
मुखिंही ॥ ऐसें मज गमतें ॥ फिरलें प्रस्तुत
दैवचि तें ॥ १ ॥

आणि हे खरोखरच आहे कीं, एकदा संकटें
येऊं लागलीं, म्हणजे एका मागून एक जास्तच
येऊं लागतात. (इतक्यांत एक माळी येतो).

सुनंद—(मुजरा करून) महाराजांचा जयजयका-
र असो.

चंद्रकांत—तुझा विजय असो. कोण आहेस तूं.

सुनंद—सरकारांनीं या बागेचें रक्षण करण्याविषयीं

ज्याची योजना केली असा जो **सुनंद** नामक माळी तोच मी.

चंद्रकांत—अहा! तूं माझा प्रियकर मित्र असून ह्या वेळीं मला इतकी विस्मृति पडली ना?

सुनंद—ह्या गोष्टीचेंच मला आश्चर्य वाटतें.

चंद्रकांत—असो मला क्षमा कर.

सुनंद—माझी एक विनंति आहे.

चंद्रकांत—सांग काय आहे तें. तुला अभय आहे.

सुनंद—ऐकावें.

साकी.

रवितापें जगुं मृदुरातोत्पळ कोमेजुनियां जावें ॥ तैसे आपुलें अनन कंज कां म्लान होचि वदावें ॥ गात्रां विकलमती ॥ ऊष्ण श्वास दीर्घ निघती ॥ १ ॥

एकाएकीं असा प्रकार होण्याचें कारण काय?

चंद्रकांत—शाबास **सुनंदा**! ह्यावेळीं जी माझी स्थिति झाली ती जाणलीस खरी. अरे—

पद.

(काय बेट्या हरिणाची मजा.)

सदना त्यागुनी विपिनीं रमतां सुखनच मज गमतें ॥ मित्रा ॥ प्रिय कांतेविण प्रिय ना वाटे दुजि रमणिय चरितें ॥ मित्रा ॥ कामनल करी तनुवन दग्धाचि भाना हरिलें तें ॥ मित्रा ॥

खानपानादिक विषयसम भासें खचलें धैर्य चि तें ॥ मित्रा ॥ १ ॥

काय सांगूं, एक वस्तूवांचून हे सर्व प्रकार असे होऊन गेले. त्यामुळें चैन पडत नाहीं.

सुनंद—आपल्या सारख्या सुज्ञानीं ह्याविषयीं विचार केला पाहिजे. कारण,विधिनियम कधीं चुकत नाहीं.

चंद्रकांत—आतां त्या विधिनियमावरच भरंवसा कोठपर्यंत ठेवूं?

सुनंद—माझ्या विनंतीकडे प्रभूनीं अवधान ठेवावें.

साकी.

मन आशा पूरित होण्यातें किमपि न धैर्य त्यजावें ॥ मार्जारयत्नें सेवी दुग्धहि प्रमाण हेंचि पहावें ॥ विचार मज सुचला ॥ त्यागा व्यर्थ शोक आपुला ॥ १ ॥

चंद्रकांत—शाबास सुनंदा! तुझ्या वाणीला लौकर यश येवो. आणि माझें इच्छित पूर्ण होवो.

सुनंद—आज्ञाधारकानीं सदोदित आपल्या स्वामीच्या मनाला आनंदीतच ठेविलें पाहिजे.

चंद्रकांत—हें तुझें लिनतेचें स्वामिभक्तिकारक भाषण श्रवण करून आनंद होतो. मनाच्या दुःखद-कालीं प्रिय आणि चतुर मनुष्यें जवळ असलीं ह्मणजे फारसें वाईट वाटत नाहीं.

सुनंद—महाराज, दुःख मानलें तर अगणित आहे, आणि न मानलें तर मुळींच नाहीं.

चंद्रकांत—सर्व खरें, परंतु मनाची अशी चमत्कारिक

स्थिति आहे कीं, ज्या गोष्टीकडे एकदा लागलें तिकडून पुनः निवत नाहीं. त्यांतून ह्या स्त्रीयांविषयीं कोणाचें बरें मन शांत राहिल.

दिंडी.

उदकपर्णे वनिं सेवुनी रहाती ॥ असें तापसि या स्त्रिया भुलुनि जाती ॥ अशा शाल्योदन सौख्य भक्षणाचें ॥ कसे होईल मग दमन इंद्रियाचें ॥ १ ॥

असा प्रकार जर ईश्वर नियमीतच आहे. तर उपाय काय! दैवगती जर सुफलित झाली, तर एका क्षणांत सर्व गोष्टी आनंदकारक होतात. नाहीं तर सर्वच विपरीत होतात.

श्लोक.

(मंदाक्राता)

हा हा दैवा अघटित तुझा मेदिनीं माजि डंका ॥ राजालागी धन हिन करी राज्य देशील रंका ॥ देवा दैसा त्रसित करिशी मानवा त्राण कोठें ॥ रक्षी माता स्वतनय परी साहिलें कष्ट मोठें ॥ १ ॥

तर मी तुला अनन्य शरण आलो आहे, याजकरितां मजवर दया कर आणि सर्व संकटांतून दूर करून एकांतस्थानीं रममाण होण्यास उत्तम रमणी दे. ह्मणजे ह्या सौख्याचा उपयोग होईल, नाहीं तर माझी स्थिती कशी आहे.

पद.

(शैवालेयुक्त जैसे.)

शुभ्रांशु शांतकारी परि तरणी भासतो ॥ मृदु गातिचा शीत वायू वज्रासमजाचितो ॥ कुसुमाचा गंध देहीं शल्यचकीं टोचितो ॥ चंदनाच्या उटी योगें जणुं अग्नी जाळितो ॥ १ ॥

अशी स्थिती झाल्यामुळें संपत्ती राज्य वैभव असून एक्या स्त्रीमुळें सर्व व्यर्थ असे भासूं लागलें काय करूं.

सुनंद—प्रभूनीं इतका आधीरपणा जर ठेविला तर शरिराला फार त्रास होईल. याकरितां मज गरिबाची विनंती मान्य करावी.

चंद्रकांत—काय सांगतोस ह्या मदनाच्या आपस्मार रोगानें माझी तनू अगदी तापून गेली, तर हिला शांती कशानें होणार.

सुनंद—याकरितांच मी उपाय योजिला आहे.

चंद्रकांत—कोणता बरें सांग पाहूं.

सुनंद—प्रस्तुत नवकुसुमानीं युक्त आशा मालती लता मंडपांत आपण क्षणभर बसल्यास त्या ठिकाणीं सीतता बरीच आहे आणि मंद सुगंधवायूनें शांती वाटेल.

चंद्रकांत—फार चांगलें जशी तुझी इच्छा असेल. तसे कर.

सुनंद—यावे महाराज, (पुढें जातात तो लतामंडप

पाहून) या स्फटिक शिलातळावर क्षणभर बसावें. मी वाळ्याचें थंड पाणी आणि शीतोपचाराचे पदार्थ घेऊन येतों.

चंद्रकांत—ह्या शीतोपचारानें काय होणार ?

सुनंद—कांहीं तरी शांति वाटेल.

चंद्रकांत—जशी तुझी इच्छा असेल तसें कर. (सुनंद निघून जातो.)

काय करूं ह्या :—

पद.

(या उपवनिंची सुंदर शोभा.)

सुंदर स्थल परी नच मनिं स्थिरता ॥ विरह प्रियेचा भ्रमवी चित्ता ॥ ध्रु० ॥ सुम तरु जेवीं कंटक रानीं ॥ नच सुखि निद्रा वन्हीं शयनीं ॥ जळविण मीन कीं जेविं कुमुदिनी ॥ क्रोधें स्मरशर योजी घाता ॥ सुं० ॥ १ ॥

असा माझा हा प्रकार कोणाला समजल्यास मी निंदेस पात्र होईन; ह्या गोष्टीची भिती पाळावी लागते. आईला जर सांगावें तर माझा उत्छृंखल स्वभाव समजून आई मला दूषण देईल. बरें, मी तरी काय करूं ? हें नवयौवन निघून गेल्यावर मग मला सुख मिळून काय उपयोग? हे देवाधिदेवा, मी तुझा असा अपराध कोणता केला ह्मणून दुःख देतोस? तर—

पद.

(नोंहे नारी हीं चंचल वल्ली.)

स्तवितों दिनतारक लक्ष्मीकांता ॥ मज तारिं अनंता ॥ धांव धांव अहितल्पकीं शयना सुजनपालका ये धीमंता ॥ ध्रु० ॥ माया कौतुक हे विलास करिशी ॥ स्त्री इच्छा धरिशी ॥ वृंदाप्राप्तीस्तव असुरहि नटशी ॥ तरी वनिं तपशी ॥ सेवे सादर श्री असुनी खाशी॥ परवनिता वरिशी ॥ द्वैतभाव तव मानसीं कैसा॥ विश्वाविण मी कां गुणवंता ॥ स्त० ॥१॥

भगवंता, आपली इच्छा पूर्ण करण्याकरितां आपण नानाप्रकार करतां, मग मज गरिबाचें दुःख कसें ध्यानीं येत नाहीं ? (असा विचार करित स्तब्ध बसला असतां निद्रा लागते.)

(इतक्यांत **चंद्रकला** व तिची सखी **मालती** बगीच्या पहाण्याकरितां प्रवेश करतात.)

चंद्रकला—सखे, आज गडे आपण ह्या बगिच्याकडे फार दिवसांनीं आलों नाहीं बरं ?

मालती—हो गडे, तुझ्या आईला राणीसाहेबांकडून मेजवानीकरितां बोलावणं आलं होतं, त्या वेळीं या बागेंत आपण आलों होतों; त्याजवर कधींच आलों नाहीं !

चंद्रकला—आपल्या बागेपेक्षां ह्या ठिकाणीं किती मौज आहे पाहिलीस ना ?

मालती—सखे, राजे लोकांस कोणत्या गोष्टिची न्यूनताका आहे?

चंद्रकला—खरंच गडे, थोरांचीं सर्वच लक्षणं सुखकारक असतात.

मालती—सखे, हा मार्ग पाहिलासना कसा वालुकामय असून किती नीट आहे !

चंद्रकला—अग हेंच काय?

पद.

(नच दृष्टिस पडती ते सज्जन.)

दोहों बाजुनीं सुरतरु सुंदर पहा शोभती कसे ॥ वाटे नभपंथें जातसे ॥ गुलाब चंपा बकुल कुंद पारिजात मनोहर दिसे ॥ पसरिले गालिचे कायसे ॥ आम्र निंब दाडिंब पोफळी नारिंगें पपनसें ॥ फलांनीं नम्र जाहले असे ॥ जाइ जुई मालती मल्लिका तारुण्यें लालसे ॥ प्रेमोत्कर्षा दावीतसे ॥ १ ॥

काय मौज आहे! इथं मन कसं शांत झालं!

मालती—अग ह्मणूनच अशा सुंदर स्थलाला आराम अशी संज्ञा आहे!

चंद्रकला—सखे गडे, मला एक आश्चर्य वाटतं!

मालती—कोणतं सांग पाहूं?

चंद्रकला—ह्या ताटव्यांतील गालिच्याचा प्रकार पाहून मला असं वाटतं,हीं सर्व एका झाडाचींच फुलं आहेत किंवा निरनिराळीं आहेत?

मालती—अग हें माळ्याचं कौशल्य आहे. त्यानं सर्व निरनिराळ्या रंगाचीं फुलझाडं बेताबातानं लावून हा प्रकार साधला आहे.

चंद्रकला—आपण किनई आतां त्या कारंज्याकडं जाऊं चल.

मालती—चल तर. (चालून कारंज्याजवळ येतात.)

चंद्रकला—अग बाई, इथं तर मन फारच मोहित होतं!

मालती—हें पाहिलंस का कारंजं किती शोभादायक आहे तें! याचे फवारे उडून जें जलबिंदु शरिरावर पडतात त्या योगानं कशी शांती वाटते व हे लहान मोठे मच्छ कशी स्वैर क्रीडा करितात!

चंद्रकला—खरंच, हा राधाकृष्णाचा जोडा प्रेमालिंगन सुखांत परस्पर अधराचं चुंबन—(इतक्यांत लाजून पदर पांघरून खालीं पाहते.)

मालती—कांग, असा काय तुला विपर्यास वाटला?

चंद्रकला—कांहीं नाहीं.

मालती—अग म[illegible]ा शंका धरावयाची?

चंद्रकला—शंका कसली? सहज पदर सांवरला यांत काय झालं?

मालती—इतक्यांत लागलीच तोंड काय उतरलं! नाकावर व कपाळावर घाम काय आला! हे विकार उगीच होत नसतात!

चंद्रकला—विकार कसले? ही रम्य शोभा पाहून मला वाटलं, बाबांनीं माझ्या बागेंत कांहीं अशी तजवीज केली नाहीं!

मालती—हें कोणाला शिकवितेस ! हे सर्व कामपिडेचे प्रकार आहेत. माझा तर्क कधीं खोटा होणार नाहीं. सांगेनास काय झालं तें ?

चंद्रकला—सांगूं काय !

पद.

(पुष्पपराग सुगंधित शीतल.)

वृक्षलता नवयौवनिं डोलती ॥ जणुं प्रेमभरें सुख सेविती ॥ कुसुम विकासित तृप्त बघोनी चित्तीं कितिक धरूं शांति ती ॥ ध्रु० ॥
समिर मंदगति येत कसा हा विरहि जनहि पीडित ते ॥ उभय असति तरी सुखद वाटतें पशुपक्षी प्रेमें क्रीडती ॥ वृ० ॥ १ ॥

हा चमत्कार पाहून एखाद्या पर्वताला जसा व्रणवा लागावा तसं माझ्या अंतरांत झालं. पतिसमवेत असें सुख मी केव्हां भोगीन?

मालती—अग, सूर्यानें उदय पावणार नाहीं ह्मून विचार केला तर चालेल का ?

चंद्रकला—सगळं खरं, परंतु तूर्त अशी स्थिति झाली त्यामुळं असं वाटतं.

श्लोक.

(भुजंगप्रयात.)

तरू पाक्षि तैसे पशू जातिमाजी ॥
स्त्रिये संगतीं प्रेम सेवोनि राजी ॥
कसें यौवनें पीडिलें मजनूला ॥

कधी कांत एकांत शांती मनाला ॥ १ ॥

तसंच, हा कोकिलपक्षी आम्रवृक्षावर बसून आपल्या प्रियेच्या मुखांत मुख घालून किती प्रेमानं शब्द करीत आहे, व ती स्त्री काय सुखांत आहे ! (मूर्च्छा आली असें जाणून सखीच्या खांद्यावर मान टाकते.)

मालती—सखे चंद्रकले, शहाण्या माणसांनीं इतका प्रकार करणं हें बरं दिसत नाहीं. हें जर कोणी पाहील, तर काय बरं ह्मणेल ?

चंद्रकला—सखे, काय करूं मला किनई असा प्रकार कांहीं पाहिला ह्मणजे अगदीं चैन पडत नाहीं ! आणखी हा जीव नकोसा होतो.

मालती—अगं, आमच्या सारखं का तुमचं आहे? थोरामोठ्याचं लग्न विचारा विचारानं झालं पाहिजे.

चंद्रकला—उत्तम आम्रवृक्ष जर पर्वतशिखरावर असेल तर त्याला फळं येऊन काय उपयोग होणार ! त्या ठिकाणीं कोणाचाही प्रवेश होणार नाहीं.

मालती—याविषयीं काळजी ईश्वराला आहे, त्याच्या ध्यानांत सर्व गोष्टी आहेत.

चंद्रकला—मी आपल्याकडून मनाला पुष्कळ धीर देतें, परंतु कांहीं केल्या चैन पडत नाहीं. पर्वतापासून निघालेला नदीचा जलौघ मध्येंच कसा बरं थांबवितां येईल?

मालती—सखे, मनाला ज्या गोष्टीपासून दुःख होतं, तीच गोष्ट वारंवार मनांत आणल्यापासून त्रास

होतो, तर आतां इथं उभं राहून उपयोग नाहीं. चल आपण पलिकडे जाऊं.

चंद्रकला—चल तर. माझ्याही मनाला असंच वाटतं.

मालती—मी किनई माळ्याचा शोध करून येतें. तों-पर्यंत तूं त्या मालतीमंडपाजवळ उभी रहा.

चंद्रकला—बरं तर, लौकर ये हो. (पुढें जाते तों चंद्रकांतास निजलेला पाहून) कोण हा भाग्य-शाली या ठिकाणीं निद्रिस्थ झाला आहे? काय मनमोहक स्वरूप आहे!

पद.

(एक चतुर नार करकरे.)

मन शांत होई मुखचंद्र बघुन ॥ सुमनाचि कांती तारुण्य नूतन ॥ दिसे भाग्यशालि प्रियकर नरवर ॥ ध्रु० ॥ मोदीत अब्जवरि भ्रमर फि-रत ॥ नव केतकिपत्रीं नाग डुलत ॥ तशि झालि गती हर्षित निरभर ॥ म० ॥ १ ॥

अहा हा! याप्रमाणें अप्रतिम मूर्ति मी कधींच पाहिली नाहीं! आणि असं माझं मन कधींही को-णत्याच ठिकाणीं लुब्ध झालं नाहीं! यावरून म-नाला असं वाटतं, आणि—

साकी.

शुभ चिन्हें आज होती सापरि वामनेत्रही लवतो ॥ बोले शास्त्रवच विरहि स्त्रियांतें स्वा-

मी संगम घडतो ॥ मग मी दैवाची ॥ शांती होईल सौख्याची ॥ १ ॥

अहा हा! जर या शृंगारविलासी पुरुषाबरोबर माझं लग्न होईल, तर किती आनंद होईल! मग मी—

पद.

(मन्नेत्र गुंतले.)

प्रियाच्या तनूशीं ॥ करपाशीं ॥ अलिंगोनी ॥ पियूष प्राशी ॥ अधराशीं ॥ चुंबनानीं ॥ मग्न विलासी ॥ अनंगाशीं ॥ जिकोनीं ॥ अर्धांगीवास होता ॥ स्वर्गच कीं लाभला ॥ १ ॥

(असें बोलून झाडास टेंकून त्याजकडे पहात उभी रहाते. मनाशीं) या सुंदर तनूला मीं आपल्या हातानं मैलागिरी चंदनाची थंड उटी लावीन. सुगंधित नवकुसुम हार गळ्यांत घालून हातांत गजरे घालीन, मांदिलावर तुरा खोंवीन, त्रयोदश गुणी तांबूल करून जिवलगास मोठ्या नम्रतेनं देऊन मदनोन्मादक शृंगारादिक भाषणानं आणि हावभाव नेत्रकटाक्षादि चेष्टांनीं शांतवीन. (विचार करून) अहो जिवलगा,

श्लोक.

(भुजंगप्रयात.)

पदीं ठेविलें चित्त मी भाव योगें ॥
बहू गांजिलें अंतरीं कामरोगें ॥

जणूं भ्रंग कंजावरी ठेवि प्रीती ॥
तदा तुमच्या संगतीं तोष चित्तीं ॥ १ ॥

याप्रमाणें माझा निश्चय झाला. जसा—

पद.

(सुखवी नयन किती.)

पशुपति हा खाण्याविण सुकला ॥ अथवा बहु रोगानें पिडिला ॥ ध्रु० ॥ परि द्विपगंडस्थलभेदाची ॥ ठेवी निशिदिनीं आस मनाला ॥ प० ॥ १ ॥ नच गमती सा क्षुल्लक पशुतृण ॥ तैसा निश्चय माझा ठरला ॥ प०॥ २ ॥

देवा, ही जी प्रीति माझ्या मनांत दृढ झाली, ही मात्र कमी होऊं देऊं नको, आणि ह्या चित्तचकोरासही मजविषयीं प्रेम उत्पन्न कर, ह्मणजे आनंदानें विनोदपर शृंगारादि विलास सुख भोगीन. या संसारामध्यें सुख म्हणजे स्त्रीपुरुष उभयतां समान असून, एक चितानं वागणं या परतं दुसरं कांहीं नाहीं. संपत्ति पुष्कळ असून काय उपयोग! मनायोग्य पतीवांचून सर्व व्यर्थ आहे. (विचार करून) जिवलगा, मी आपल्या चरणीं माझं सुमन अर्पण केलं आहे, तर त्यांत अंतर आणूं नका. आपल्यावांचून या जगांत कांहीं प्रिय नाहीं असं मला ह्या वेळीं वाटूं लागलं आहे. नाहीं तर—

साकी.

चुकवुनि व्याधा तोडुनि जाळें टाळुनि दावा-
ग्नीला ॥ हरिण त्वरें धांवुनियां जातां अवचि-
त कूपीं पडला ॥ ऐसें मज होतां ॥ करिन
मी तत्क्षणिं प्राणांता ॥ १ ॥

असा मी माझ्या मनाचा दृढ निश्चय केला तर याला मान देणें आपल्याकडे आहे. दीनजनाचें रक्षण करणें हें थोरांचें कर्तव्यकर्म आहे. त्याप्रमाणें या दुःखित अबलेला पदरांत घ्या. (त्याजकडे पहात स्तब्ध रहाते.)

सुनंद—(मनाशीं) काय ईश्वरलीला चमत्कारिक कीं, महाराजांना स्त्रीविषयीं विरह उत्पन्न होतांच या चंद्रकलेच्याही मनांत महाराजांविषयीं मोह उत्पन्न झाला. ह्या सर्व तिच्या मनाच्या उद्गारावरून खचीत वाटतें कीं, या उभयतांचें एक चित्त होईल. आणि असा प्रकार झाल्यावर उभयतांच्याही सौख्यास पारावार नाहीं. या वेळीं ही चंद्रकला कशी दिसते !

दिंडी.

चपल चपला जणुं नभीं युक्त तेजें ॥ चंद्रकां-
तातें योग्य प्रिया साजे ॥ शुभ्रवसना परिधा-
न जिनें केलें ॥ गमे यामिनि शशिरुपा ब-
घुनि डोले ॥ १ ॥

देवा, आमच्यासारख्या आश्रितांची इच्छा हीच कीं, स्वामी आनंदांत असले म्हणजे आम्हांस कोणत्याही गोष्टीविषयीं काळजी नाहीं. तर ही माझी प्रार्थना मान्य करून हा योगायोग जमीव. (विचार करून) बरं, आतां जर मी महाराजांजवळ जाईन, तर या चंद्रकलेच्या मनाचा विरस होईल, आणि तसें झालें असतां महादोष आहे, याकरितां आपण क्षणभर झाडाचे आड उभें राहून आणखी काय प्रकार होतात ते पहावे. (झाडाचे आड उभा रहातो.)

चंद्रकला—ईश्वरा, पूर्वजन्मार्जित सुकृताचा ठेवा चांगला असला म्हणजे या जन्मीं सर्व सौख्य मिळतं असं महा पुरुषाचं वाक्य आहे. त्याप्रमाणं मला सर्व गोष्टी अनुकूल आहेत, मग इतकीच गोष्ट कां बरं तूं उणी ठेवशील? तूं दयाशील आहेस, व सर्वत्राच्या विनंतीस मान देतोस, तर मी दीन अबला या वेळीं तुझी प्रार्थना करीत आहें, हिला मान देऊन आमचा उभयतांचा विवाह होऊं दे. देवा, मनायोग्य जोडा असला ह्मणजे शृंगाराची शांति होते. ह्मणून या मोहक स्परूपाला बघून आनंदीत झालें आहें. (इतक्यांत **मालती** येते.)

मालती—(**चंद्रकलेस** विचारांत पाहून मनाशीं) सखी **चंद्रकला** यावेळीं फार गहन विचारांत आहे, तर एखाद्याचा मनोभंग करूं नये. आतां इच्या मागून जाऊन हिचं लक्ष कोणत्या

वस्तूकडे लागलं आहे हें पहावं. (मागें उभी राहते.)

चंद्रकला—(मनाशीं) प्राणेश्वरा, आपल्या सर्व वैभवावरून मला वाटतं आपण राजपुत्र आहांत. (थांबून) महाराज, मी क्षुल्लक वैश्याची कन्या आहें. ह्मणून माझ्या मनांत नाना कुतर्क येतात कीं, आपण माझा अंगिकार कराल किंवा नाहीं कोण जाणें. (थांबून) खरंच आहे, प्रीतिसंगमाला जातीचा भेद मुळींच नाहीं. (थांबून) आपल्यापेक्षां माझी फजिती ज्यास्त होईल. कारण, मी स्त्री जात आहें. पुरुषांना कोण नांव ठेवणार ?

मालती—आतां ह्या सखीचे मानसीक विचार कोठपर्यंत चालवणार कोण जाणे ! तो पुरुष निजला आहे, आणि ही तर आपल्या ठिकाणीं सुख मानीत आहे, हे प्रकार कोणी पाहिले तर माझी आधीं फजिती होईल. आणि स्नेहधर्म हाच आहे कीं कोणी वाईट मार्गांत पडत असल्यास त्यास त्यापासून लौकर दूर करावं, हेंच उचीत. (हाका मारेत) चंद्रकले, अग चंद्रकले.—

चंद्रकला—(घाबरून इकडे तिकडे पाहते) कोण तें?

मालती—इतक्यांतच माझा विसर पडला काय ?

चंद्रकला—सखे, तूं का मला हांक मारलीस? हें गडे माझ्या ध्यानांतच नाहीं.

मालती—अग, मनाप्रमाणं कोणतीही वस्तू सांपडली ह्मणजे असंच ध्यान रहात नाहीं.

चंद्रकला—(लज्जित होऊन स्तब्ध रहाते.)

मालती—इतकं कांहीं वाईट वाटायला नको.

चंद्रकला—सखे, मी अपराधी आहें, मला क्षमा कर.

मालती—ईश्वर तुला क्षमा करो आणि तुझें इच्छित पूर्ण होवो.

(इतक्यांत **सुनंद** नामक माळी हातांत चंदनाच्या उटीचें पात्र व शीतलोदकाची झारी घेऊन येतो. **चंद्रकला** व **मालती** त्यास पाहून बाजूस उभ्या राहून.)

मालती—सखे, **चंद्रकले** चल आतां बराच वेळ इथं येऊन झाला.

चंद्रकला—माझ्या मनांत—

मालती—सांग सांग, काय असेल तें.

चंद्रकला—(तिच्या कानांत सांगते.)

मालती—इतकंच ना! मी विचारतें त्याला, तो माझ्या ओळखीचा आहे. (**सुनंदास**) कारे **सुनंदा**, कुठं गेला होतांस ?

सुनंद—सरकारांना उष्णाचा ताप फार झाला म्हणून शीतलोपचार आणण्याकरितां गेलों होतों.

मालती—सरकार कोणते ?

सुनंद—ह्या नगरचे राजे **चंद्रकांत** महाराज, जे ह्या मालती मंडपांत स्फटिक शिळेवर निद्रिस्थ झाले आहेत ते.

मालती—हेच का **चंद्रकांत** महाराज ?

चंद्रकळा—(मनांत हर्षित होऊन लाजून खालीं पहाते.)

सुनंद—होय. आतां मला आज्ञा असावी, महाराजांना जागृत करून हे उपचार केले पाहिजेत.

मालती—बरं तर जा. सखे, आतां चल आपल्या घरीं जाऊं.

चंद्रकला—चल, (असें म्हणून मागें पहात चालूं लागते.)

(सुनंद माळी चंद्रकांताजवळ येऊन त्यास जागृत करतो.)

चंद्रकांत—कारे सुनंदा, (इतक्यांत चंद्रकलेकडे लक्ष जाऊन परस्परांची दृष्टादृष्ट होते) अहा हा! काय अप्रतीम स्वरूप हें!

सुनंद—महाराज, हें वाळ्याचें थंड पाणी आणि चंदनाची उटी आणली आहे, तर प्रभूच्या शरीराला ही उटी लावितों. हे उदक ग्रहण करावें.

चंद्रकांत—(मनाशींच) ह्या स्त्रियेकडे पाहिल्यापासून माझी चित्तवृत्ति बदलून गेली. ही विद्युल्लतेप्रमाणें एकाएकीं माझ्या दृष्टीस भ्रमित करून नाहींशी झाली. वहावा! काय सौंदर्यवान् आहे. सखे—

पद.

(काय मला भूल पडली.)

स्पर्श हर्षवील तुझा सुभग सुंदरी ॥ मीनकेतनास जशी आम्रमंजरी ॥ ध्रु० ॥ कीं तुझ्या अधरदेशीं मधुर शारदा ॥ कर्णीं ती भागीर-

थि मनुज मोक्षदा ॥ कृष्ण वेणि विलसे ती शि-खरिं सर्वदा ॥ तीर्थराज पाहुनि हा धन्य अं-तरीं ॥ स्प० ॥ १ ॥

अशा त्रिवेणी संगमीं स्नान करून मी केव्हां कृतार्थ होईन? बरें ही कोण असावी? (विचार क-रून, हें वर्तमान **सुनंदास** माहीत असेल असें जा-णून) कारे **सुनंदा**, तुला एक गोष्ट विचारतों, खरें सांगशीलना?

सुनंद—हें काय महाराज, स्वामी चरणाजवळ मी अ-नृत कधीं बोलणार नाहीं.

चंद्रकांत—ह्या दोन स्त्रिया बागेंत आल्या होत्या ह्या कोण आहेत?

सुनंद—ही आपल्या नगरांतील जो **वीरसेन** साव-कार त्याची कन्या **चंद्रकला**, व दुसरी तिची सखी **मालती**, बागेंत विहार करण्याकरितां आल्या होत्या.

चंद्रकांत—(मनाशीं) किती मी हतभागी! ही सुंदरी बहुत वेळ ह्या ठिकाणीं असून मला दुर्दैवानें नि-द्रा लागली.

सुनंद—महाराज, हें उदक ग्रहण करितां ना?

चंद्रकांत—(पाणी पिऊन) आतां कांहींसें शांत वाटूं लागलें. बरं **सुनंदा**, राजवाड्यांत जा आणि आ-ईला सांग कीं, मी विलासभुवनामध्यें कांहीं गुप्त विचारांत निमग्न आहें, कारण लागल्यास मला कळवावें. (माळी निघून जातो) अहा हा! प्रिये.

श्लोक.

(मंदाक्रांता.)

पाहूं कोठें त्वदिय मुख तें कामपीडा शरीरीं ॥ व्यापी तेणें त्रिभुवन दिसे शून्य जैं अंधकारीं ॥ प्रातश्चंद्रापरि मन अशा निष्प्रभत्वास गेली ॥ नाहीं शांती विरहगतिनें देहशुद्धी विराली ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

अंक १ ला समाप्त.

अंक २ रा.

(चंद्रकला आपल्या महालांत एकटी बसली असतां मनाशींच)

चंद्रकला—काय बाई मनाची स्थिती असेल ती असो, ज्या गोष्टीकडे एकदां लागलं तिकडून पुनः तें निघत नाहीं. त्यांतून विलाससौख्याकडं लागलं म्हणजे तर पाहयालाच नको! चंद्रकांत महाराजांस पाहिल्यापासून कांहीं सुचत नाहीं. त्यांतून हा मदन तर बाई अगदीं त्रासून सोडतो. याच्या पुढं कांहीं चालत नाहीं. काय करूं? अरे मदना, व्यर्थ मला कां पीडा देतोस?

पद.

(ऐक सख्या चातुरारे.)

नव्हे मी गिरिजापती ॥ मदना ॥ कुंतलकलाप वेणी बघ नाहीं जटेची आकृती ॥ कंठीं कस्तूरि ती ॥ पाहुनी ॥ नीलकंट प्रभू मानूं नको ही गरलेपरि भासती ॥ शशिसम नग घालिती ॥ स्त्रिया शिरिं ॥ भालचंद्र वाटे तरि शोधी स्त्रीपुरुषांची कृती ॥ विरहाची उन्नती ॥

प्रियांच्या ॥ पांडुरता तनुवरी जाणसी भस्म चर्चिलें अती ॥ चंद्रकला मी सती ॥ वणिक-सुता ॥ चंद्रकांतसह सुख भोगावें हेंच मनीं वांच्छिती ॥ नव्हे० ॥

कोणतंही मनासारखं कार्य करायाला तयार झालं कीं त्यामध्यें अनेक विघ्नं येऊं लागतात; तर हे कुसुमाकरा, तूं शांत हो. मी जेव्हां त्या महाभागाच्या आलिंगनसुखांत निमग्न होईन, त्यावेळीं जर अशी पीडा देशील, तर किती बरं आनंद होईल! तुला शंकरांनीं दहन केला, त्यामुळं तूं अनंग असून इतकी पिडा देतोस, तर प्रत्यक्ष देहधारी असतास तर काय केलं असतंस कोण-जाणें! (विचार करून) अहाहा, कमलावर जसा भ्रमर गुंजारव करून मधु सेवन करितो, त्यावेळेस त्याला दुसरं कांहीं सुचत नाहीं, तशी शृंगारसुखानुलिप्त झालेली माझी तनु त्या चित्तचकोराच्या आलिंगनसुखांत अर्पून त्याच्या अधररूपी कमलांतून ज्याकालीं माझा मनोरूपी भृंग मधुसेवन करील, तेव्हां शांतता वाटेल. हे सौभाग्य सुखकर चंद्रा, काय तुझ्या मुखाच्या ठिकाणीं मोहिनी असेल ती असो, एकवार पाहिल्याबरोबरच अशी स्थिती झाली तर आतां इतकीच विनंती कीं,

अंजनीगीत.

आशा बहु ही कोकिल मनिंची ॥ वसंति आ-

व प्यायाची ॥ होवो शांती सकल जना-
॥ मंजुल वाणीनें ॥ १ ॥

सा प्रकार त्याच्या मनांत येऊन तो आनंदांत तां जर कां व्याधानें बाण मारला, तर मात्र विचार जागचेजागीं राहून तळमळून प्राण ील; त्याप्रमाणेंच माझें लक्ष आपल्या चरणीं लं आहे, तर विन्मुख करूं नका म्हणजे झालें. नल्या वियोगामुळें—

पद.

(राग कानडा, ताल त्रिवट.)

हुं किती या यातना ॥ काम जाळि तनु-
ानना ॥ ध्रु० ॥ त्रिभुवन भासे शुन्यचि मज-
ा ॥ सफल होय कधिं कामना ॥ सा० ॥१॥
व मूर्ती मम ह्रदयीं बैसुनि ॥ व्यक्त करी
नरंजना ॥ सा० ॥ २ ॥

एकांत स्थानीं बसलें खरी, परंतु वारंवार ापल्याविषयीं मनांत विचार येऊन शरिरांत अनि-ाच्य जी स्थिती होते, तिच्या योगानें हा प्राण नकोसा वाटतो. त्यांतून आणखी असें होतें.

पद.

(मज बहुताचि ही आशा).

अति सुखकर ह्या कुसुमगंधयुत लहरी ॥ शीत
चंदन हा उपचारी ॥ सायोगें मी व्याकुल होतें

भारी ॥ तव विरहें स्मरशर मारी ॥ चाल ॥ जलाविण मिन तलपे जैसा ॥ अहिदशें व्याकुल तैसा ॥ मम कृश तनु ही पांडुरतायुत सारी ॥ किति जाच साहुं शरिरीं ॥अति०॥१॥

(असें बोलून कामव्याप्त होऊन चिंतायुक्त स्तब्ध रहाते.)

(इतक्यांत एक साधु प्रवेश करितो.)

पद.

(तुजवरून काया ओवाळुं कीं.)

स्मर मना विधि हरिहरा समज धर जरा नको पडुं ख्यालीं ॥ जलतरंग तैसे संग ढंग हे अंति कोणि ना वाली ॥ ध्रु० ॥ बहु कष्ट असति जीवाशी लक्ष चौऱ्याशी योनी फिरला ॥ अधिं होतें थोडके पुण्य म्हणुन या नरदेहाशीं आला ॥ नव मास जननि उदरांत मैल रक्तांत सोहं शब्दांत स्तवी देवाला ॥ उदरांतुनि बाहेर पडे सोहं रडे भुलुनि मायेला ॥ शिशुरूप जाई क्रिडेंत तरुण विषयांत भुले वृद्धांत सुत स्त्रीधनाला ॥ नाहीं ईशस्मरण कसें होईल तरण यम हरण करी प्राणाला ॥ यातना बहुत यमपुरीं म्हणुन स्मर हरी दया तो करी प्रभू वनमाली ॥ जल० ॥ १ ॥

साधु—या जगामध्यें मुमुक्षुजनांस ज्ञान व्हावें ह्मणून नानाप्रकार करून ठेवले आहेत; व सुखोपभोगाकरितां सर्व वस्तु निर्माण केल्या आहेत; परंतु मा-

याजालानें हें ब्रह्म व्यापून गेल्यामुळें त्याचा भेद करण्याची शक्ति विशेषतः कोणाच्याच अंगीं नसते; आणि असलीच तर त्याजवर भगवत्विभूती असल्यामुळें मायेच्या जालापासून कांहींच होत नाहीं असा प्रभूचा नाममहिमा आहे.

(इतक्यांत **चंद्रकला** सुवर्णाच्या ताटांत भिक्षा घेऊन येते.)

चंद्रकला—(त्यास पाहून मनांत) अहा हा ! काय तेज आहे—

दिंडी.

ध्यान नासाग्रीं जटाभार माथां ॥ पुण्यसामर्थ्यें तारिती अनाथा ॥ ईश विभुतिरूप वस्त्र असे देहीं ॥ गमे षड्रिपुची शक्ति नसे कांहीं ॥१॥

सर्वसंग परित्याग करून पूर्णब्रह्मस्वरूपीं मन अगदीं तल्लीन झालं आहे. काय तपतेज हें ! (त्यांस नमस्कार करून) ही भिक्षा घ्यावी.

साधु—(आशिर्वाद देऊन) कोण आहेस तूं ?

चंद्रकला—महाराज, मी **वीरसेन** सावकाराची कन्या, मला **चंद्रकला** असें ह्मणतात.

साधु—तूं विवाहिता आहेस किंवा कुमारि आहेस ?

चंद्रकला—प्रभो, मी अद्याप कुमारीच आहें. तर मजवर कृपा करून सुप्रसाद व्हावा. व माझ्या मनांतील कामना पूर्ण व्हावी.

साधु—भगवत्कृपेनें तुझे इच्छितार्थ सफल होतील.

(असें बोलून मनाशीं)

साकी.

सुंदर कांती नवयौवनयुत रतिवत् भासे मजला ॥ वाटे योगा टाकुनि इजसह भोगावें सौख्याला ॥ होईन संसारीं ॥ मोदित शिशु बघुनी भारी ॥ १ ॥

(असें बोलून कांहीं वेळ उभा राहून) काय मोहक वस्तु आहे!

चंद्रकला—(त्याची चित्तवृत्ति बदलली असें पाहून व उभी राहून मनाशीं) अग बाई !

पद.

(टाकिला यानें)

साधु हा खोटा ॥ खोटा मज कळलें ॥ मुख हें पाहतां मन चळलें ॥ बाह्य दृष्टीनें ॥ दृष्टीनें सत्य दिसलें ॥ अंतरीं कपट असे भरलें ॥ धांव श्रीहरी ॥ हरी दीन झालें ॥ काय मम हस्तें अघ घडलें ॥ यास्तव संकट ॥ संकट ओढवलें ॥ देईं सुख दावी पदकमलें ॥ १ ॥

काय निंद्य कर्म हें! केवळ बगळ्या सारखी वृत्ति दिसूं लागली !

साधु—हें अलौकिक स्वरूप पाहून मला असें वाटतें—

पद.

(वीरशिरोमणि सकलधनुर्धर)

पंच रत्न स्मर गाळुनि विधिनें मूस जेविं ओतिली ॥ गौरतनू सुस्वरूपें शोभली ॥ कामी जनाचे हृद्भेदा भ्रूधनुवरि ज्या चढविली ॥ नयनशरें मम वृत्ती भुलविली ॥ चाल ॥ अधरीं मधु भाषणें लाज कोकिले प्रती ॥ मालती गुच्छपरि कुच रमणिय भासती ॥ कटि सिंहाकृति ही रंभोरु गजगती ॥ उ० ॥ नवतारुण्यें व्याप्त चित्त जी तत् स्वरूपीं गुंगली ॥ गौरतनू सुस्वरूपें शोभली ॥ पंचरत्न० ॥ १ ॥

या अनुपमेय अवयवांना उपमा देण्यास या जगांत मला एकही वस्तु दिसत नाहीं. धन्यधन्य! (असें बोलून मूर्छित पडतो.)

चंद्रकला—(घाबरून) अगबाई ! या योग्याला एकाएकीं असं काय झालं ? हा विनाकारण मजवर लोकापवाद येणार वाटतं! दैव फिरलं ह्मणजे सर्व गोष्टी विपरीत होऊं लागतात. यावेळेस माझी सखी **मालती** असती तर बरं होतं. आतां काय करूं ! (असा विचार करीत स्तब्ध राहते.)

मालती—(प्रवेश करून) सखे **चंद्रकले**, हेंग काय ? अग हा साधु इतक्यांत बोलत होता आणि याला एकाएकीं काय झालं ! हा अपवाद तुझ्यावर आल्यावांचून रहाणार नाहीं. आणि बाबांला समजलं

तर ते काय वरं ह्मणतील? त्यांतून ते जरी लोभास्तव बोलले नाहींत, तरी लोक निंदा करायला सोडतील का? मला बाई असला स्वभाव अगदीं आवडत नाहीं. असं जर करशील, तर तुझ्या बरोबर मलाही नावं ठेवतील.

चंद्रकला—सखे, मी जर कांहीं केलं असेल, तर तुझ्याच गळ्याची शपथ.

मालती—नको गडे माझ्या गळ्याची खोटी शपथ वाहूं. माझा जीव कांहीं वर आला नाहीं. अग, प्रत्यक्ष दिसत असून मग प्रमाण तें कशाला पाहिजे?

चंद्रकला—तूंसुद्धां मजवर फिरलीस? हा तुझा अपराध नव्हे. माझं प्रारब्ध.

मालती—आपलीं माणसं दूषण लागण्यासारखीं कामं करूं लागलीं तर त्यांना तीं करूं द्यावी का?

चंद्रकला—ह्मणतं कोण पण?

मालती—मग हा प्रकार कसा झाला?

चंद्रकला—सांगतें ऐक.

पद.

(नाहीं कोणीही हुंगिलें.)

साधु जाणुनी करुणा मनाला ॥ तार्टी भिक्षा आणली ज्याला ॥ देतां पाहून मम रूपाला ॥ झाला मूर्च्छित करूं मी काई ॥ १ ॥

सखे, यांत जर कांहीं माझा अपराध असेल तर सांग. मी त्यावद्दल सांगशील तें शासन भोगीन.

मालती—आग असं नव्हे, मला तरी अगोदर समजलं नव्हतं म्हणून मी असं बोललं हो. (साधूस नीट पाहून) जा थोडें थंड पाणी आण आणि त्याच्या डोळ्याला लाव, म्हणजे तो सावध होईल.

चंद्रकला—आग लागो मेल्याच्या तोंडाला.

मालती—बरं तर, मी सावध करतें (असें बोलून झारींतील पाणी त्याच्या डोळ्यांस लावून त्यास) अहो साधु महाराज, ही भिक्षा घ्या, आणि येथून जा कसे.

साधु—(सावध होऊन चंद्रकलेकडे पहात उभा राहतो.)

चंद्रकला—(रागानें) लाज नाहीं वाटत मेल्याला! साधु म्हणवितो आणि असली दुष्ट बुद्धि! ही भिक्षा घ्यावयाची असेल तर घे, नाहीं तर जा, निघ येथून.

साधु—(प्रेमानें) हे सुंदरी,

साकी.

तरु वनिं फुलती परी सांत सहकारचि नायक दिसतो ॥ ज्याच्या मंजरियोगें रतिपति भुवनत्रय जिंकीतो ॥ थोरें मान दिला। जगतीं वाढे कितीला ॥ १॥

वरच दिला असं मी समजतें. माझ्या मनांत हीच काळजी होती कीं, चंद्रकांत महाराज माझा अंगिकार करतील किंवा नाहीं; त्याला हें सबळ कारण झालं, असो. आतां दैव सुफलीत होणार. सखे मालती—

मालती—कां? काय म्हणतेस?

चंद्रकला—पाहिलंस ना, कसे साधु असतात ते?

मालती—अग, अशांच्या नादीं लागूं नये.

चंद्रकला—सखे, मी त्याला पहिल्यानं कांहींएक बोललें नवते हो.

मालती—असो, चल आपण महालांत बसूं, आणि कालचा बाकी राहिलेला अध्याय पुरा करूं.

चंद्रकला—बरं, तर चल. (दोघी निघून जातात.)
(इतक्यांत सुनंद नामक माळी प्रवेश करतो.)

सुनंद—काय चमत्कार आहे. ह्या सर्व वस्तूंमध्यें स्त्रीसारखी मोहक वस्तु दुसरी नाहीं, आणि त्या नादांत जो मनुष्य गुंतला त्याला कांहीं सुचत नाहीं.

पद.

लागली ज्यातें क्षुधा तयाला कटु मधुर चव कांहीं नुमजे ॥ चिंतेनें नच ये सुखीं निद्रा अर्थेच्छू स्वजना विसरे ॥ कामि जनाची रीतचि विपरित लज्या भय सजी बोल खरें ॥ लागली ॥ १ ॥

म्हणून तुझ्या अमोल्य स्वरूपाची भिक्षा दे म्हणजे जगतांत मी जन्मास आल्याचें सार्थक होईल. अन्य कांहीं नको.

चंद्रकला—धिःकार असो तुझ्या साधुवृत्तीला! मेल्या चांडाळा—

दिंडी.

हंस पक्ष्याचा भक्ष्य मौक्तिकाचा ॥ नेम पाहुनि प्रभु पुरवि हेतु साचा ॥ काग पक्ष्याची बुद्धि स्थिर नाहीं ॥ उदर पोशी अति निंद्य पदार्थाही ॥ १ ॥

तसा तूं आहेस. अरे नीचा, येथून लौकर निवून जा, नाहीं तर तुझी फजिती करीन.

साधु—कांहीं चिंता नाहीं. तूं माझें ऐकत नाहींस याचा विचार कर, इतक्यानेंच झालें नाहीं. तुझी पूर्ण फजिती केल्यावांचून सोडणार नाहीं; आतां येथील चंद्रकांत राजाकडे जाऊन त्याला हें वर्तमान सांगतों; म्हणजे, तो क्षत्रिय आहे व तूं वैश्यकन्या आहेस,जुलमानें तुला आपली पत्नी करील अशाविषयीं तजवीज करीन; अशी तुझ्या पित्याची, तुझी आणि तुझ्या कुलाची फजिती होईल. (रागानें निवुन जातो.)

चंद्रकला—जा जा मेल्या कर्मभ्रष्टा ! (विचार करून मनाशीं) हा याचा शाप ह्या वेळीं माझ्या मनांतील हेतूस अनुकूल झाल्यानें केवळ

वरच दिला असें मी समजतें. माझ्या मनांत हीच काळजी होती कीं, चंद्रकांत महाराज माझा अंगिकार करतील किंवा नाहीं; त्याला हें सबळ कारण झालें, असो. आतां दैव सुफलीत होणार. सखे मालती—

मालती—कां? काय म्हणतेस?

चंद्रकला—पाहिलेंस ना, कसे साधु असतात ते?

मालती—अग, अशांच्या नादीं लागूं नये.

चंद्रकला—सखे, मी त्याला पहिल्यानं कांहींएक बोललें नवते हो.

मालती—असो, चल आपण महालांत बसूं, आणि कालचा बाकी राहिलेला अध्याय पुरा करूं.

चंद्रकला—बरं, तर चल. (दोघी निघून जातात.)
(इतक्यांत सुनंद नामक माळी प्रवेश करतो.)

सुनंद—काय चमत्कार आहे. ह्या सर्व वस्तूंमध्यें स्त्रीसारखी मोहक वस्तु दुसरी नाहीं, आणि त्या नादांत जो मनुष्य गुंतला त्याला कांहीं सुचत नाहीं.

पद.

लागली ज्यातें क्षुधा तयाला कटु मधुर चव कांहीं नुमजे ॥ चिंतेनें नच ये सुखी निद्रा अर्थेच्छू स्वजना विसरे ॥ कामि जनाची रीतचि विपरित लज्या भय सर्जी बोल खरें ॥ लागली ॥ १ ॥

ह्या सर्व प्रकारचा अनुभव मला आज आला. कारण, आमचे महाराज ती सावकार कन्या चंद्रकला पाहिल्या दिवसापासून तिच्या नादीं लागले प्रस्तूत त्यांची चमत्कारिक वृत्ति होऊन एका जागीं बसून चैन पडत नाहीं. कोणाचंही बोलणें गोड लागत नाहीं. कोणत्याही वस्तु प्रिय वाटत नाहींत. भोजनावर लक्ष नाहीं. आईसाहेबांच्या ठिकाणीं त्यांचें किती मन होतें! परंतु आतांशीं त्यांना भेटण्याचा सुद्धां अभाव झाला. देवघरांत पुराण चालू झालें म्हणजे स्वतः पुराणास येऊन बसावें, तेथें तर आतां येणें सोडलं. राज्यकारभारांत ध्यान मुळींच नाहीं. गुरु आश्रमांत विद्या शिकायला जाण्याचें तें तर मुळींच बंद केलें. हे सर्व प्रकार सावकारकन्येमुळें झाले. मजवर महाराजांची पूर्ण प्रीति, म्हणून ते आपल्या मनांतील गोष्ट मजजवळ बोलतात. परंतु राजाची प्रीति संपादन करणें म्हणजे ते जें काम सांगतील तें केलें पाहिजे. मला महाराजांनीं त्या चंद्रकलेची भेट कोठें होईल अशाविषयीं शोधांत राहून मला कळीव म्हणून सांगितलें. परंतु ती एकटी कशी भेटावी? सदोदित तिच्या बरोबर तिची सखी असतेच. तिचें पूर्ण लक्ष महाराजांवर आहेच, हें मी प्रत्यक्ष बागेंतील तिच्या सर्व लक्षणांवरून जाणलें. आतां तिला एकांत गांठून तिचा मनोदय कसा काय आहे, तो पहा अशाविषयीं महाराजांनीं मला आज्ञा केली खरी, आणि हाही प्रकार करून पाहीन; परंतु

एकांत भेट कशी होईल हीच मला काळजी आहे. असो, आतां आपण तिच्या घराजवळ जाऊन बसावें, म्हणजे वेळेस ती नजरेस पडली तर महाराजांविषयीं बागेंतील खूण देऊं (असें बोलून पुढें जातो आणि बसतो, तों तिच्या घरांतून **बुद्धिमतिका** नांवाची दासी बाहेर येते.)

बुद्धिमतिका—(प्रवेश करून) आतांशी मला बाईसाहेबांची वृत्ति स्थिर दिसत नाहीं. सदा एकांतांत कांहीं विचारांत निमग्न असतात. मग काय असेल तें असो; परंतु माझ्या मनाला असं वाटतं, प्रस्तुत बाईसाहेबांची यौवनदशा पूर्णतेस आल्यामुळं केतकीपत्राप्रमाणं कांती दिसूं लागली. तारुण्याचं जें वैभव तें भरांत येऊन पूर्ण काठिण्ययुक्त झालं. आतां अशा सुंदर सुखाचा लाभ ज्याला मिळेल त्याचं थोर भाग्य समजलं पाहिजे. मागें एकदां बाईसाहेब मजजवळ बोलल्या होत्या कीं, मनासारखी गोष्ट घडली तर बरं, नाहीं तर कौमार्यवृत्तीचा अंगिकार करून दिवस घालवीन. आणि तेंही खरंच आहे कीं, स्त्रियांचं सुख काय तें पुरुषावर अवलंबून असतं, तो जर चांगला नाहीं, तर काय उपयोग? एखादे वेळीं खिडकींत बसून कोणा स्त्रीपुरुषांचा प्रेमप्रकार पाहिला म्हणजे कामाच्या योगानं संतापलेल्या नागिणीप्रमाणं स्थिति होते, व अगदीं व्याकूळ होतात. असा शृंगारलेला वारु असावा व त्याजवर स्वार नाहीं, किंवा उत्तम आंबा असावा आणि त्याचा स्वाद

घेऊन कोणीं ग्रहण केला नाहीं, तर त्याचा काय उपयोग? असो, ईश्वर करो आणि त्यांच्या मनासारखा प्रकार लौकरच घडून येवो, म्हणजे झालं. आम्हां सेवक जनांची इच्छा हीच कीं, आमच्या मालकांनीं सुखांत असावं व आम्ही पहावं, म्हणजे आनंद होतो. (सुनंदास पाहून) अग बाई, रमण बागेंतील **सुनंद** माळी इथं का बरं बसला?—याला आपण विचारावं. कारण, हा फार सुज्ञ मनुष्य आहे. जेव्हां बागेंत जावं, तेव्हां आनंदानं आपल्याशीं बोलतो, हा फार श्रमित झाला म्हणून विश्रांतीस बसला असं वाटतं, तर त्यास तृषा वगैरे लागली असल्यास विचारून त्याचा मान ठेवला पाहिजे. (त्या जवळ जाऊन) कां भाऊ, आज कोणीकडे स्वारी आली?

सुनंद—कांहीं नाहीं. सहज फिरायला निघालों. ह्या ठिकाणीं चौकांत हजारों मनुष्यें जातात येतात, हा चमत्कार पहाण्यासाठीं बसलों. आणि मनालाही आनंद होतो.

बुद्धिमतिका—आज बागेंत गेला नाहीं वाटतं?

सुनंद—हा आतां बागेंतूनच आलों. काम करतां करतां त्रास येतो, ह्मणून जरा येथें मौज पहाण्यास बसलों.

बुद्धिमतिका—हो गडे, मनुष्याला कांहीं वेळ तरी मनासारखी विश्रांति पाहिजे. तीवांचून सुख लागत नाहीं.

सुनंद—तूं कोणीकडे निघालीस इतक्या गडबडीनें?

बुद्धिमतिका—आज नवरात्राचा नववा दिवस आहे. आणि आमच्या बाईसाहेबांचा नियम आहे कीं, नवरात्रांत देवीच्या दर्शनाकरितां जावं, ह्मणून त्यांच्या मैत्रिणीला बोलवायला जातें.

सुनंद—चंद्रकलेच्या लग्नाचा कांहीं बेत ठरला नाहीं वाटतें?

बुद्धिमतिका—ठरेल कसा? त्यांच्या मनांस येईल तेव्हां ना?

सुनंद—कां बरें, कोणताच वर मनास येत नाहीं का?

बुद्धि०—थोराच्या घरीं ह्या कामाची निवडानिवड फार आहे. त्यांच्या मनांत माझ्या मनास येईल त्याजबरोबर लग्न करीन, नाहींपेक्षां तशीच राहीन.

सुनंद—ह्या गोष्टीबद्दल तिचा बाप कांहीं तजवीज करित नाहीं कां?

बुद्धि०—बाईसाहेबापुढं चालतं कोणाचं? त्यांतून एकुलत्या एक आहेत ह्मणून असा प्रकार.

सुनंद—असो, ईश्वरानें नियम केला असेल तो खरा.

बुद्धि०—त्याच्या मनांत आल्यावांचून होणारच नाहीं.

सुनंद—ठीक आहे. जा, तुला उशीर होत असेल.

बुद्धि०—बरं, भाऊ? चंद्रकांत महाराजांचा विवाह केव्हां होणार?

सुनंद—अद्याप कांहीं ठरलें नाहीं. त्यांचाही विचार तूं सांगितलास असाच आहे.

बुद्धि०—ते सत्ताधीश आहेत. पाहिजे तेव्हां मनासारखी गोष्ट करतील.

सुनंद—दैवापुढें सत्तेचें कांहीं चालत नाहीं.

बुद्धि०—भाऊ, तुला एक गोष्ट विचारतें खरी सांगशील ना?

सुनंद—काय विचारतेस? न सांगायाला काय झालें?

बुद्धि०—बोलूं नकोहो कोणाजवळ. आमच्या **चंद्रकला** बाईसाहेबांची व **चंद्रकांत** महाराजांची नजरभेट कुठं झाली होती का?

सुनंद—कां बरें? मला तर कांहीं माहित नाहीं.

बुद्धि०—एक दोन दिवसांमागं मी चोळीवर कशीदा काढीत बसलें होतें, तों ताईसाहेब पलंगावर निजल्या होत्या. त्यांच्या मनांतले उद्गार कांहीं चमत्कारिक निघाले. त्यांत "**चंद्रकांत** महाराज आपण जर माझा अंगिकार केला नाहीं, तर मी जीव देईन." असं मी ऐकलं.

सुनंद—काय असेल तें असो, मला तर हें कांहीं माहित नाहीं.

बुद्धि०—विधिनेम असेल तो खरा. आतां मला लौकर गेलं पाहिजे तर क्षमा असावी.

सुनंद—होहो. जा. नाहीं तर विनाकारण तुजवर राग होईल. (निघून जाते.) फार चांगली गोष्ट झाली; आजमात्र महाराजांची भेट होईल. असो; आतां हें वर्तमान त्यांना कळविण्याला गेलें पाहिजे. (निघून जातो).

(नंतर हातांत पुजापात्र घेऊन **मालिनी** प्रवेश करते).

मालिनी—ईश्वरानं असा चमत्कार केला आहे कीं, आपला उत्साह सकल जनांनीं करावा म्हणून मासमासाचे ठिकाणीं लीला केली. ह्याच नवरात्राचे दिवसांत किती आनंद वाटतो? सर्व नगरांतील अबालवृद्धजन आपआपल्या योग्य मानानं पोषाख करून चालले आहेत, यासारखा आनंदाचा दिवस कोणताच नाहीं. आजवरं झालं बाई, **चंद्रकले**नं बोलावणं पाठविलं, आतां सर्वजणी मिळून जाऊं. (पुढें चालू लागते.)

रोहिणी—(प्रवेश करून) **मालिनी**, (थांबून) अग **मालिनी**.

मालिनी—(मागें पाहून) कोण **रोहिणी**, आलीस का तूं?

रोहिणी—आतां **चंद्रकले**ची दासी मला बोलावयाला आली होती, इतक्यांत सासुबाईंना विचारलं आणि निघालें. मनांत होतं तुझ्या घराकडे यावं, परंतु मला आधींच तिनें सांगितलें कीं, मी **मालिनी**कडे गेलें होतें ह्मणून आलें नाहीं.

मालिनी—हो गडे, ती प्रथम मजकडेच आली आणि ह्मणाली कीं **चंद्रकले**नं लवकर बोलाविलं आहे ह्मणून निघालें.

रोहिणी—ठीक झालं, पण अझून **रेवती** कां आली नाहीं कोण जाणें.

मालिनी—ती पहा, **रेवती** येत आहे.

रेवती—(प्रवेश करून) अग बाई तुम्ही निघालांत का?

मालिनी—हो बाई, बरं झालं तूं आलीस. आम्ही तुझीच वाट पहात उभ्या होतों.

रेवती—अग, मी चंद्रकलेच्या घरीं गेलें होतें तीनं मला सांगितलं कीं, तूं पुढं चल मी आणि **मालती** येतें.

मालिनी—केव्हां पासून आम्हांला मात्र बोलावणं पाठवलं, परंतु आपण कांहीं निघाली नाहीं.

रोहिणी—अग, आपल्या सारखं कां आहे? त्यांच्या मनास येईल तेव्हां निघायाचं.

मालिनी—मग आह्मांला कशाला अधीं बोलावणं पाठवावं? आतां वाट पाहत कोठपर्यंत उभं राहवं?

रेवती—येईल ग आतां. आज किनी ती आपल्या करितां पायानंच चालत येणार आहे.

मालिनी—कांग हिच्या लग्नाचं बाई केव्हां जमेल तें जमो.

रोहिणी—तिला किनी आतांशी फार वाईट वाटूं लागलं.

मालिनी—कां बरं?

रेवती—अग, आपण सगळ्या जणी सुखांत अहोत हें पाहून.

मालिनी—व्यर्थ वाईट वाटून काय उपयोग? नशीबीं असलं पाहिजे ना.

रेवती—यांत जास्त काय सांगितलस?

रोहिणी—**रेवती** अशी रागवूं नको तूं.

रेवती—यांत राग कसला? (इतक्यांत **चंद्रकला** व **मालती** येतात.)

मालिनी—ती बघ **चंद्रकला मालतीसह** आली.

रेवती—हो गडे बरं झालं, आतां चला पुढं जाऊं.

चंद्रकला—बरं झालं गडे, मला किनी मोठी काळजी होती कीं तुम्ही याल कीं नाहीं कोण जाणें.

रेवती—न यायला काय झालं? त्यांतून तुझ्या बोलावण्याला कां येणार नाहीं?

मालती—अग, अशीं सर्वजणींचीं मनं एकसारखीं असलीं म्हणजे सगळ्यानांच आनंद वाटतो. प्रीती ही वस्तु फारच चमत्कारिक आहे; तिला पार नाहीं.

मालिनी—हो गडे,आतां जशीं आपलीं मनं एक आहेत, अशीच अखेरपर्यंत राहोत आणि सुख मिळो.

रोहिणी—चला गडे, उगीच उशीर होतो.

चंद्रकला—झाला उशीर तर झाला, काय करायचं आहे लौकर येऊन?

रेवती—घरचीं माणसं रागं भरतील तीं?

मालिनी—मग निघालांत तरी कशाला?

मालती—अग, आज नवरात्राचा शेवटला दिवस आहे. तर दोन घटका उशीर लागला तर हरकत नाहीं.

रेवती—तुला घरचा धाक नाहीं, पण आह्मांला आहे ना?

चंद्रकला—मी किनी तुझ्या सासऱ्याला सांगितलं होतं कीं, मला आज देवीच्या दर्शनाला जायचं आहे तर मी **रेवतीला** घेऊन जाईन. या करितां दोन घटका उशीर लागला तर मी त्यांना सांगेन.

मालिनी—हिचा सासरा तुझ्या इथं का असतो?

मालती—होय ते तर पुष्कळ दिवस आहेत.

रोहिणी—यांच्याकडं काय काम आहे?

चंद्रकला—सर्व जामदारखानाच यांच्या स्वाधीन आहे.

मालती—आतां ईथं किती वेळ बोलत उभ्या राहणार? चला आतां.

चंद्रकला—चला. (सर्वजणी निवून जातात. पडदा पडतो.)

अंक २ रा समाप्त.

अंक ३ रा.

(नंतर विरहानें व्याप्त झालेला चंद्रकांत प्रवेश करितो.)

चंद्रकांत—(मनाशीं) अहा हा! चंद्रकलेला पाहिल्या वेळेपासून मनाला चैन पडत नाहीं. केव्हां ती दृष्टीस पडेल असें मला होऊन गेलें आहे. सुनंदाला मी सांगितलें आहे, तो काय करितो पहावें, म्हणजे मग पुढें आपली तजवीज. (इतक्यांत साधु येतो त्यास नमस्कार करून).

पद.

(नाहीं झाले षण्मास मला.)

बहु कोपयुक्त स्वामि हृदय कांहो जाहलें ॥ विनति मान्य करुनि वदा कोणि गांजिलें ॥ध्रु०॥
काय सेवेशीं न्यून होय भूल मज करीं ॥
काय नगरीजन बोलतात दुष्ट उत्तरीं ॥ आज्ञा मज व्हावी करिन दंड सत्वरीं ॥ नवल काय वाटलें ॥ बहु० ॥ १ ॥

महाराज, असा कोणता विपर्यास वाटला तो मला सांगावा. या ब्रह्मवृंदाच्या रक्षणासाठीं आमच्या पूर्वजानीं अनेक संकटें सहन केलीं.

योगी—राजा, तुह्मासारख्या नृपतींनीं जर आमच्या सारख्या साधूंचा परामर्ष घेतला नाहीं तर काय उपयोग?

चंद्रकांत—महाराज, कोशागारांतील धन दुसऱ्याच्या उपयोगीं जर पडलें नाहीं, तर तें त्याच ठिकाणीं राहून त्यापासून कांहीं तरी सुख होणार आहे काय? मला आमच्या गुरु महाराजांनीं उपदेश केला आहे कीं—

पद.

(साध्य नसे मुनि कन्या.)

साधु जनां सुखवावें ॥ नमुनी तत्पदीं लीन रहावें ॥ ध्रु० ॥ तीर्थादिक फिरुनी व्रत करिती ॥ गिरिकंदरीं बसुनी ईश स्तविती ॥ देउनि साहित्य भावें ॥ त्यांच्या आशिर्वचनां घ्यावें ॥ साधु० ॥ १ ॥

तसेंच—

अन्नोदक सम दान दुजेना ॥ भक्तीयुत पुजी धेनुद्विजांना ॥ स्वजनीं प्रेम असावें ॥ नगरीजन ते पुत्र गणावे ॥ साधु० ॥ २ ॥

त्या गुरुवाक्याची स्मृति ठेवून आजपर्यंत चाललों आहें.

योगी—शाबास राजा, आणखी असें आहे—

साकी.

राजतरूतें मंत्री शाखा पर्णे नगरी जन हे ॥

मूल असे म्हणुनि तयांना सुखवीतां भय
॥ ऐशी सद्बुद्धी ॥ असतां होईल
द्धि ॥ १ ॥

—आपल्यासारख्यांचा असाच अनुग्रह आ-
वर असेल तर किमपिही चिंता नाहीं. परंतु
आपल्या मनांत काय हेतु आहे; तो सम-
नाहीं.

-ठीक आहे.—

पद.

(शशिकुल भूषण.)

ो परिसे मम बोला ॥ नगरीं जहाल्या वृ-
ा ॥ मोतीचौक प्रख्यात स्थान तैं पूर्ण
देसला ॥ नगरी० ॥ ध्रु० ॥ सुंदरी उभि
ग्याची ॥ भुतली उपमा नसे साची ॥ रंभे-
बहु तेजाची ॥ सिमाही विधि चातुर्याची॥
प्राप्त तुला कैंची ॥ सफलता होईल ज-
ी ॥ उ० ॥ रत्न साध्य हे करुनी घेई
स्वर्गलाभ जहाला ॥ नगरीं ॥ १ ॥

जा, याप्रमाणें ती अलौकीक सौंदर्यभामिनी
वनानें पूर्ण दशेस आली आहे, अशी विला-
तुझ्या मंदिरांत असावी असें माझे मनांत
कारण, मी सर्वसंगपरित्याग करून योग
करणारा असून माझें चित्त भ्रमित होऊन
मग तुझी काय कथा! याकरितां त्वरा करून

तिची प्राप्ती करून घे. तिचे नयनशर खरोखर सहन होणार नाहींत असा कांहीं प्रादुर्भाव तिच्या अंगीं आहे!

चंद्रकांत—आपल्या वाणींचा अनादर मी कधींही करणार नाहीं. तिची प्राप्ती करून घेण्यास मला फार विलंब किंवा प्रयत्न लागणार नाहींत. आणि लागले तर आपल्या वचनाकरितां करीन परंतु कार्य सिद्धीस नेईन.

योगी—शाबास! तूं वचन मान्य केलेंस येणेंकरून मी धन्य आहें, आतां मी जातों.

चंद्रकांत—महाराजांना माझा प्रणाम आहे.

योगी—ईश्वर तुझे इच्छित हेतु पू[illegible] करो. (असें म्हणून निघून जातो.)

चंद्रकांत—(मनाशीं) अहा हा! प्रिये चंद्रकले—

पद.

(वसंतीं बघुनि मेनकेला.)

बघुनि तव आनन सुधांशुला ॥ मोह जाहला मनीं परी स्मर जाळी या तनुला ॥ सुचेना राज्यकाराला ॥ अन्नोदक ना रुचे सदोदित ध्यास तुझा धरिला ॥ केतकी भुजंग जणूं रमला ॥ किंवा चुंबकमणि लोहाचा संगम गे घडला ॥ तसें कधीं देशील सौख्याला ॥ मरणोन्मुख गती झाली पाजी अधरामृत मजला ॥ १ ॥

हे गजगामिनी, आतां कोठपर्यंत अंत पहाशील! सर्वस्वीं मी तुझ्या स्वाधीन होण्यास तयार आहें, तुजवांचून मला कांहींच इष्ट वाटत नाहीं. (विचार करून) अरे हे मदना, तूं इतका अनिवार तापद कां झालास? प्रिय जनाच्या वियोग समयीं तुला दुसऱ्यास दुःख देण्यास चांगली संधी सांपडते. अरे!—

पद.

(हा उत्सुक तव संगमा.)

ही कोमल तनु तव पिडें आपांडु झाली ॥ रोमांच घर्मयुत क्षामदशा जणुं जडली ॥ चिंतेंत व्याप्त मन सदा नयनगती शिणली ॥ क्षणें मूर्च्छित चेतन क्षणांत भ्रांती पडली ॥ चाल ॥ किती धीर मनामध्यें धरूं ॥ काय मी करूं ॥ होई वाली ॥ रो० १ ॥

नको नको! असा प्रताप दीन जनास दाखवूं नको. त्या प्रियेची आणि माझी एकांतीं भेट होईल त्या वेळीं जर तूं छळशील, तर किती बरें आनंद होईल? परंतु ह्या वेळीं तुझा प्रताप केवळ पर्वताशिखरावर पर्जन्यवृष्टि अथवा धेनुचा किंवा विप्राचा घात केल्याप्रमाणें मला भासतो, तर ह्या वेळीं क्षमा कर. (असें बोलून विचार करीत उभा राहतो, इतक्यांत **सुनंद** नामक माळी येतो.)

सुनंदमाळी—(प्रवेश करून) अहाहा! सर्व छंद्रांत

स्त्रियांचा छंद फार कठिण आहे. या नादीं जो लागला त्याला कांहीं सुचत नाहीं. हं, आमचे महाराज, पहा कसें सावकारकन्येच्या विरहानें व्याकुळ होऊन गेले आहेत ! त्यांना ह्या वेळीं कांहींच सुचत नाहीं. जसें—

साकी.

माध्यान्हीं रवि तेज प्रखर बहु या योगें कांतारीं ॥ हरिणवृंद धांवती सेवना समजुनियां जललहरी ॥ तैसें मत्प्रभु हें ॥ भुलले चंद्रकला मोहें ॥ १ ॥

काय करावें? ईश्वर करो, आणि ह्या उभयतांचा प्रेमयुक्त विवाह होवो, ह्मणजे ठीक होईल; नाहीं तर चक्रवाकपक्ष्याप्रमाणें स्थिती होईल. बरें, **चंद्रकले**-ची तरी अवस्था अशीच झाली ह्मणून **बुद्धिमति**-केनें मला सांगितलें; तेव्हां हा योग जमण्याला फार प्रयत्न लागणार नाहीं. असो, आतां महाराजांस आपण ऐकलेलें वर्तमान सांगावें. ह्मणजे आपली कामगिरी बजाविल्याप्रमाणें होईल. (मुजरा करून) महाराजांचा विजय असो.)

चंद्रकांत—(शुद्धीवर येऊन) कोण **सुनंदा**, कां? तूं ज्या कार्याकरितां गेला होतास त्याच कस्य झालें?

सुनंदमाळी—स्वामीकार्याकरितां कोणी अंतर करील काय?

चंद्रकांत—ह्मणूनच मी तुला काम सांगितलें. बरें काय झालें?

सुनंदमाळी—आज **चंद्रकला** आपल्या सख्यांना बरोबर घेऊन नवरात्राचा नववा दिवस आहे ह्मणून देवीच्या दर्शनाकरितां जाणार आहे, असें तिच्या **बुद्धिमतिका** नामक दासीनें मला सांगितलें.

चंद्रकांत—शाबास! तुझे अनंत उपकार मजवर आहेत.

सुनंदमाळी—महाराज, यांत उपकार तो कसला? सेवकाचा धर्मच हा आहे.

चंद्रकांत—तिचा आणि माझा विवाह झाला ह्मणजे तुझे उपकार मी ठेवणार नाहीं. असो, आतां सायंकाळ होण्याचा समय आला आहे. तर देवीच्या देवळांत लौकरच गेलें पाहिजे.

सुनंदमाळी—होय महाराज त्या बहुतकरून गेल्या असतील.

चंद्रकांत—ठीक आहे, तूं येतोस का माझे बरोबर?

सुनंदमाळी—जशी प्रभूंची आज्ञा होईल त्याप्रमाणें वागण्यास हा दास तयार आहे.

चंद्रकांत—चल तर; तूं बरोबर असल्यापासून कितीक हित होणार आहे.

(निघून जातात.)

(तदनंतर सर्व सख्यांसह **चंद्रकला** प्रवेश करते.)

चंद्रकला—सखे आज किती फार लोक दर्शनाला चाललेत बरं का.

मालती—अग, आजचा शेवटचा दिवस आहे ह्मणून—

मालिनी—गडे, आज देवीच्या देवळांत फारच मौज असेल बरं का ?

रेवती—होय, सर्व नगरांतील स्त्रिया आल्या असतील. कितीएक गाणीं ह्मणतील. नाहीं गडे ?

चंद्रकला—बरं झालं गडे आठवण केली. आपल्याला सुद्धां गाणीं म्हणायाचीं आहेत.

मालती—दरवर्षीं आपण म्हणतोंच; तशी यंदाही ह्मणूं. (पुढें जातात.)

(इतक्यांत देवीच्या देवळाजवळ येऊन.)

चंद्रकला—सखे **मालती**, आपले भटजी ग कुठं आहेत ? तें कांहीं दिसत नाहींत.

मालती—(इकडे तिकडे पाहून) ते पहा तिकडे बसले आहेत.

चंद्रकला—त्यांना बोलाविनास इकडं.

मालती—कशाला तें.

चंद्रकला—अग उगीच, बिच्याऱ्याला चार पैसे मिळतील.

मालती—बरं तर—(पुढें जाऊन) अहो भटजी इकडे या.

ब्राह्मण—(पुढें येऊन) महाराज.

चंद्रकला—अहो तुम्ही होता कुठं ? मी तुम्हांला केव्हांपासून पाहतें.

ब्राह्मण—बाईसाहेबाच्या कामगिरीला हजरच आहें.

चंद्रकला—काम कांहीं नाहीं. तुह्माला दक्षिणा द्यायची म्हणून बोलाविलं हो.

ब्राह्मण—गरिबावर इतकी कृपा असली म्हणजे मला कांहीं कमी नाहीं.

चंद्रकला—चला तर देवळांत.

ब्राह्मण—बरें तर चला—(असें बोलून देवीचें दर्शन घेऊन प्रदक्षिणा घालूं लागतात.)

(इतक्यांत **चंद्रकांत** येतो.)

चंद्रकांत—काय करावें ! ती प्रिया केव्हां दृष्टीस पडेल असें मला होऊन गेलें. **सुनंदानें** सांगितल्याप्रमाणें जर मजविषयीं तिच्या मनांत असेल तर ही गोष्ट घडण्यास फार विलंब लागणार नाहीं. असो, ती आतां आपल्या सख्यांबरोबर देवळांतच असेल, तर आपणही जाऊन तिला पहावें. व आज कसेंही करून तिच्याबरोबर बोलण्याचा प्रसंग आणायचा. निदान वेळ आलीच तर आपण तिचा हात धरून स्वच्छ विचारूं. मग मनांतील शंका अगदीं दूर होईल. बहुतकरून ती माझ्या गोष्टीस नाहीं म्हणणार नाहीं. (पुढें जाऊं लागतो. इतक्यांत स्त्री समाज पाहून ह्या बकुलवृक्षाखालीं स्त्रीसमाज बसला आहे. परंतु यांत ती सुंदरी दिसत नाहीं. (पुनः इकडे तिकडे पाहिलें तो **चंद्रकला** दृष्टीस पडते.) अहाहा! किती रमणीय स्वरूप आहे.

पद.

(हे मना सोड कल्पना.)

ही रती परी भासती भुलवि मज अती कांती कनकाची ॥ किती अवयव गोंडस कमाल विधिच्या मतिची ॥ धिग् उमारमा इज-समा झालि रूप सिमा लता कामाची ॥ नसे उपमा क्ष्मा आणि व्योमीं पहातां साची ॥ करि विलास बोले सखिस भुषणापरिस रम्य कृति हिची ॥ ही मिळतां कांता सुगती मम दैवाची ॥ १ ॥

बरं आतां हिची आपली भेट व्हावी कशी? हिच्या बरोबर तर सख्या आहेत, तेव्हां आपल्याला कोणताही प्रकार करितां येणार नाहीं. (विचार करून) आतां ह्या प्रदक्षिणेला जातील त्या वेळीं आपण हिच्या दृष्टीस पडून खूण करावी, ह्मणजे ती समजेल. आपली हिची जरी ओळख नाहीं, तरी **सुनंदाच्या** सांगण्याचा आधार पक्का आहे. त्यामुळें ती केवळ माझ्या खुणेचा अनादर करील असें वाटत नाहीं. आणि कदाचित् ती जर न बोलली, तर अखेरीस तिला तूं कोण आहेस असें विचारून बोलण्याचा घाट आणूं. ह्मणजे झालें, तर आतां त्या प्रदक्षिणेच्या वाटेवर जाऊन आपण उभें रहावें. (जाऊन उभा रहातो.)

चंद्रकला—सखे **मालती**, आतां किनी आपण इथं गाणी ह्मणूं.

मालती—बरं तर आह्मांला काय, तूं जसं सांगशील तसं कां होईना.

चंद्रकला—रहा तर उभ्या. ह्मणजे आपण फेर धरून गाणीं ह्मणूं.

सर्वजणी—बरं तर.

पद.

(रघुपती राम रुदेमोरेहे जोरे या गर्भ्याच्या चालीवर.)

जय अंबे माय पावे भवानीगे ॥ विश्वतारक तव ख्याती अवनीं ॥ ध्रु० ॥ शेष स्तवितां द्विजिव्ह जहालागे ॥ चार सहांत महिमा भरलागे ॥ ब्रह्म गोळहि रचिलि लीला ॥ जय० ॥ १ ॥ भक्ति परिसूनि धांवसी कांजे ॥ ब्रीद कंठीं भूषण साजे गे ॥ क्षणमात्रें करी रंक राजे ॥ जय०॥२॥ तीव्र शस्त्रें घेउनि हातींगे ॥ चंडमुंड सहज निःपातिगे ॥ शिव प्रीया ह्मणती जगतीं ॥ जय० ॥ ३ ॥ दीन होउन विनवितें तुजसींगे ॥ हेतु पुरवूनि सुखवीं मजसींगे ॥ देई कांतसौख्य विलासी ॥ जय अंबे माय०॥

चंद्रकला—आतां क्षणभर इथंच बसूं, मग जाऊं घरीं.

चंद्रकांत—अहा हा ! हे सुंदरी.

पद.

(तनु इचि सुंदर.)

अपूर्व भासे मला ॥ मोह जहाला ॥ शोभती

अवयव यौवनीं जिला ॥ मनोहर करिते सहाजिक लिला ॥ १ ॥ चंचलता ही नयनीं ॥ हास्य मृदु वदनीं ॥ चमत्कृति विलासयुत भाषणीं ॥ आच्छादित कुच वस्त्रांतुनी ॥ २ ॥ चाल जणू गजगती॥ सिंव्हाकृती ॥ कटीवरि आभरण नाजुक अती ॥ विद्युत्सम नयना दिपविती ॥३॥

ह्या सर्व पृथ्वींत जरी शोधिलें तरी तुझ्या अवयवांना उपमेयोग्य वस्तु दृष्टीस पडणार नाहीं. धन्य धन्य ! हे तुझे अलंकार कीं ज्यांना नेहमीं तुझा संगम घडतो तेच जर मी झालों असतों तर किती धन्य झालों असतों! पण ह्या गोष्टी घडतात कशा ! माझें इतकें थोर भाग्य आहे काय कीं ?

पद.

(झाली सफलही मम कामना.)

देई सखि मम शरिरालिंगना ॥ ध्रु० ॥ करिं भाषण बहू सखिसह प्रेमें ॥ लीलेनें सुख होइ मना ॥ १ ॥ हास्ययुक्त नयनाचे प्रखर शर ॥ योजि कसे हृद्वेदना ॥ २ ॥ कधिं येइल दिन मद्भाग्याचा ॥ नच सोसति या वेदना ॥ ३ ॥

चंद्रकला—(राजपुत्राचें गायन ऐकून मनाशीं) अगबाई, **चंद्रकांत**महाराज इथं आलें आहेत वाटतं! ह्या मंजूळ गायनानं माझ्या मनाला आनंद झाला. आजपर्यंत अशी माझी वृत्ति कधींच चंचळ झाली नव्हती,परंतु त्या दिवशीं बागेंत पाहिल्या दि-

वसापासून मला दुसरं कांहीं सुचत नाहीं. काय करावं? सख्या जवळ आहेत यांना जर सांगावं तर त्या माझी थट्टा करतील, आणि पुनः काय होईल कोण जाणें! (विचार करून) कसं तरी करून ह्यांचेबरोबर बोलणं झालं पाहिजे. त्यानीं गायनांत जें मला सुचविलं त्यावरून वाटतं कीं, ते खरोखर माझा अंगिकार करतील ह्यांत संशय नाहीं.

मालती—सखे चंद्रकले, संध्याकाळ होत आली, सर्व लोक आपल्या घरीं जाऊं लागले, आतां कोठपर्यंत बरं इथं बसायाचं?

चंद्रकला—थांब गडे, पुनः दर्शन घेऊन जाऊं.

मालिनी—हें ग काय बाई असं, तुला कोणी बोलणार नाहीं, परंतु आम्हांला घरीं धाक आहे ना?

रेवती—खरंच गडे, मी घराहून निघालें, तेव्हांच सासुबाई म्हणाल्या तूं चंद्रकलेबरोबर जातेस ना? मग लौकर कशाची येतेस!

मालिनी—मी बाई जातें, आतां तुम्ही या हो लवकर मागून.

चंद्रकला—अग हो, मोठी धाकाची आहेस ती माहित आहे.

मालती—असं ग काय करतेस? चालेसना आतां घरीं? इथं विनाकारण बसून तरी काय करायचं आहे?

चंद्रकला—अग, अशी मौज पुनःदृष्टीस पडणार नाहीं.

मालती—तुझ्या पुढं बाई बोलावं कोणीं? (सर्वजणी चालूं लागतात)

चंद्रकला—(मागे पहात पहात) तुमचा आग्रहच आहे तर चला.

(सर्वजणी निघून जातात.)

चंद्रकांत—अहाहा! भाग्योदय आला म्हणजे सर्व विघ्नें दूर होतात. इच्या सख्या आतां निघून गेल्या. व सायंकाळचा समयही बराच आहे. तेव्हां आपण होऊन पुढें जाऊन तिला उभी करावी व विचारावें. (असें बोलून तिच्या पुढें उभा राहतो) हे मदनशरशांतिनी सौंदर्यनिधे, कां बरें असा संकोच धरतेस?

पद.

(हा सुखकर बघुनि आराम)

नवनलिनी परी कोमल तनु तव सुंदर भासे मला ॥ स्पर्शे हर्षे करि शांत आम्रमंजरिनें स्मर तापला ॥ ह्या अधर सुधारसपानीं होऊं दे धन्य पुरवि हेतुला ॥ करपाशचि हा योग्य असे गे कामि जनाला भला ॥ कुचाग्र भली टोंचुनि विंधी ध्यास तुझा लागला ॥ अधर कपोलावरी करी व्रण दंताचा मानला ॥ शृंगारादिक विलास करण्या समय कसा पातला ॥ बोल तुझे पीयुषाचे मानिन शांतवि कामानला ॥

चंद्रकला—अग बाई.

साकी.

परकांतिसह भाषण करणें उचित नसे तु-
म्हांतें ॥ कां हो शंका त्यागिली आजी कुलवं-
ता दुषण तें ॥ विचार थोरांनीं ॥ निशिदिनीं
ठेवावा ध्यानीं ॥ १ ॥

या असल्या प्रसंगाला म्हणावें तरी काय?

चंद्रकांत—याला—

पद.

(चल उद्यां बघ जातें)

दुजी नच उपमा ॥ पुरवीं मम इच्छित कामा ॥
ध्रु० ॥ प्रियेसह विनोद जो एकांतीं ॥ तया
शृंगार ही संज्ञा देती ॥ होते आनंदें सुख
शांती ॥ मर्दुनि कामा ॥ मिळतां तुज ऐशी
भामा ॥ दु० ॥ १ ॥

सत्ता असल्यावांचून कां असे प्रकार होतील!

चंद्रकला—काय आपली मजवर सत्ता आहे?

चंद्रकांत—नाहीं ह्मणतो कोण?

चंद्रकला—(मनाशीं) काय ग बाई करावं? मनाला पुष्कळ धीर देतें, परंतु उपाय चालत नाहीं. केव्हां प्रियाच्या आलिंगन सुखाचा अनुभव घेईन अशी उत्कंठा वारंवार होते. परंतु शांतपणें स्त्री धर्माचे जे नियम आहेत त्याप्रमाणं यांच्या मनांतील भावार्थ जाणल्या वांचून स्वाधीन होऊं नये. (उघड)

पद.

(नाहीं कोणीही हुंगिलें.)

नको व्यर्थचि माझी आस ॥ नका योजूं प्रेम-
पाश ॥ दुजी रामा मिळतां खास ॥ मन चंचल
होईल आपुलें ॥ १ ॥ थोर करिती जैशा कृ-
तिला ॥ नच निंदिती जन राजाला ॥ आहें
मी वैश्यकन्या अबला ॥ कशी होईल प्रित
उभयांची ॥ २ ॥ शंका ऐशी वाटे मनाला ॥
म्हणूनियां हेतू सजिला ॥ मान द्यावा मम
विनतीला ॥ हृद्गद हें केंवी जाणूं ॥ ३ ॥

चंद्रकांत—इतकेंच ना ! मग ह्याविषयीं इतकी—

पद.

(केलीस अशी काय परिक्षा तूं सखे गे.)

झालीस अशी शंकित मनीं काय प्रिये गे ॥
हेतू तव प्रीतिविषयीं बहुत असे गे ॥ ध्रु० ॥
मम वचन सत्य मान असे लेख विधीचा ॥
तुजलागिं सजुनि नलगे संग अन्य युवतिचा ॥
भ्रमरास मान्य कमलगंध शोध मनाचा ॥
न मानशीं याच समयीं देतों प्राणगे ॥ झा० ॥

(खंजीर घेऊन पोटांत मारूं लागतो इतक्यां-
त चंद्रकला त्याचा हात धरून)

चंद्रकला—महाराज, हें काय बरं? मजवरच्या प्रेमाची सीमा कोठपर्यंत आहे हे पाहण्याकरीतां असा प्रकार केला. मी आपल्या वचनाबाहेर नाहीं.

पद.

(ठाऊक मजला आहे ऋषींचें)

वसंत कुसुमाकरा रती मी कर ग्रहणा
साजिरी ॥ चंद्रासह जणूं कला तशी मी
शोभेन अंकावरी ॥

चंद्रकांत—पुरला मनिंचा हेत गोड करीं शेवट
या उपरी ॥ गुप्तपणा हा सजुनी उघडपणें
क्रिडूं सुख मंदिरीं ॥

चंद्रकला—गुरुसदनीं या हर यत्नें ही अबलाधरा-
वी करीं ॥ पदकमलीं लीन झालें पाळा
अर्धांगी सुंदरी ॥

चंद्रकांत—प्राणांतापर्यंत राक्षिन धनलोभी द्र-
व्यापरी ॥

चंद्रकला—प्राण दान हे दिलें सागा सख क-
ल्प वैखरी ॥ १ ॥

(परस्परांस आलिंगन देतात.)

अहो, सौभाग्यसुखकरनाथा, जशी आज आपली भेट होऊन आनंद झाला, तशी उदईक विजयादशमी आहे, याकरितां सुमुहूर्तानं विवाह करा, म्हणजे झालं. जिवलगा आपण याल ना? नाहीं तर विनाकारण मला चक्रवाकीप्रमाणं झुरणीस लावूं नका.

चंद्रकांत—प्रिये, हे काय भलतेंच मनांत आणतेस? अग, तुझ्याकरितां मी सर्वस्वाचा त्याग करून तूं

सांगशील त्या रीतीनें वर्तणूक करीन. परंतु ह्या दिनावर तुझें प्रेमछत्र असूं दे.

चंद्रकला—अगबाई, दीनपणा तो कसा! घरीं सर्व अनुकूल असून मजसारखी स्त्रीही मिळाली.

चंद्रकांत—तुझ्या प्रीतिविरहित मात्र दीन आहें.

चंद्रकला—महाराज आपण राजे आहांत. माझा अंगिकार कसा कराल ह्मणून मला मोठा विचार होता; परंतु ह्या वेळीं मला सर्वस्वी आनंद झाला.

चंद्रकांत—सखे, तूं चतुर आहेस, या तुझ्या प्रेमयुक्त भाषणानें माझी खात्री झाली.

चंद्रकला—मी महाराजांना एक वेळ पाहिलं पण-- (स्तब्ध रहाते.)

चंद्रकांत—हे मनोरमे, कां बरें असें संदिग्ध बोललीस?

चंद्रकला—बायकांच्या अंगीं पुरुषांपेक्षां दुप्पट लज्जा असते ह्मणून विचारलं नाहीं. त्यांतून विचारलंही असतं, परंतु माझा उच्छृंखळ स्वभाव आपल्या ध्यानीं येऊन आपण माझा अंगिकार केला नसता. (इकडे तिकडे पहाते.) जिवलगा, रात्र फार होत चालली, सख्याही दूर गेल्या असतील. आतां गडे, मला जाऊं द्या, नाहीं तर कोणी पाहील आणि आपल्या प्रीतिचा विरस होईल.

चंद्रकांत—प्रिये, ही वेळ निवांत आहे, तर क्षणभर वसूं, नंतर जाऊं. तूं काळजी करूं नको, मी तुला घरापर्यंत पोंचवीन, मग तर झालें ना ?

चंद्रकला—अग बाई, असं झालं म्हणजे मग तर फजितीला पारच नाहीं !

चंद्रकांत—बरें क्षणभर बैस तर खरी.

चंद्रकला—(गळां मिठी मारून) जा गडे, माझं कांहींच कां ऐकायचं नाहीं?

चंद्रकांत—ऐकेन, परंतु—

पद.

(ठुंबरी साधी ताल त्रिवट.)

ठुंबरी.

प्रिये मज देईंगे रतिदान ॥ समयीं उत्तम स्थान ॥ ध्रु० ॥ कुसुमशरानें पीडितसें मीं ॥ जाती तुजविण प्राण ॥ १ ॥ यास्तव शांतवुनी देहाला ॥ मम वचनातें मान ॥ २ ॥

सखे, असा माझा हेतु आहे, तुझा विचार कसा काय आहे?

चंद्रकला—प्रियत्तमा, असं काय बरं करतां. अविचारानं कार्यसिद्धि होत नाहीं, आतां मी आपली प्रिया झालें हीच मला आपल्या प्रेमाची शपथ आहे. उद्ईक विजयादशमीच्या मुहुर्तानं विवाह करूं.

चंद्रकांत—सखे, तुझ्या वियोगामुळें ही रात्र मला कल्पाप्रमाणें भासेल.

चंद्रकला—हो! बरी आठवण झाली, उद्ईक आपण याल तेव्हां कांहीं तरी निमित्यानं गुरुजींस शाळेतून घालवून द्या, ह्मणजे आपलं कार्य निर्भय सिद्धीस जाईल. आणि विवाहाची सामुग्रीही बरोबर घेऊन यायला गुरूला सांगा, त्यांच्या साक्षीनं विवाह करूं.

चंद्रकांत—बरें तर.

चंद्रकला—जातें तर मी आतां. (त्याच्या तोंड
पहाते.)

चंद्रकांत—सखे,

साकी.

तव गालीं कैशी ही दिसते गुलाबकुसुम
कांती ॥ इच्छा मानसीं भ्रमरापरि गे मधु से
सुखशांती ॥ यास्तव चुंबन दे ॥ माझें स्म
हृदीं असुं दे ॥ १ ॥

(चुंबन घेऊन निघून जातात.) पडदा पडतो

अंक ३ रा समाप्त.

अंक ४ था.

(सुमेधाजवळ आहे, अशी चंद्रकला पुस्तक वाचीत गुरुआश्रमीं बसली असतां पडदा उघडतो.)

चंद्रकला—(मनाशीं)

पद.

(बहुत छळियलें)

कितिक दुखविशी ॥ देवा त्रस्त दिननिशीं ॥ध्रु०॥ मानियेला मना सौख्याला ॥ जणुं अंबा रानीं केल्या हरितालिका व्रताला ॥ ती जेवीं त्या उपवनीं तारिली तैसे पाळिशी ॥ दे० ॥१॥

काय करूं? मनाला कोणत्याच गोष्टीपासून सुख होत नाहीं. ज्या वेळीं जें सुख असावं तें जर त्या वेळीं नसेल तर असा प्रकार होतो. महाराजांना मी लौकर या ह्मणून सांगितलं होतं, अद्याप येणं कां होत नाहीं कोण जाणें. गुरुजी आतां येतील. माझा पाठ संपल्यावर मला लौकर घरीं गेलं पाहिजे.

मालती—सखे, अशी सदा विचारांत काय निमग्न असतेस?

चंद्रकला—महाराजांनीं मला काल वचन दिलं आणि

लौकर येतों ह्मणून सांगितलं. परंतु अद्याप आले नाहींत!

मालती—सखे, इतका उतावळा स्वभाव ठेवून उपयोग नाहीं; मनाला कांहीं अवरलं पाहिजे.

चंद्रकला—अग, चंद्राला पाहून कमलं विकासित होण्याचीं रहातील का? काय बाई, त्यांच्या ठिकाणीं मोहनी असेल ती असो. मुरलीचा नाद ऐकून जशी राधिकेची अवस्था, तशी माझी झाली आहे. एकवार प्रीतिसंगम घडला, मग कांहीं चिंता नाहीं.

मालती—चंद्रकले, गडे माणसानं प्रत्येक गोष्टीविषयीं विचार केला पाहिजे. नाहीं तर दुप्पट त्रास होतो. शहण्या मनुष्याला ज्यास्ती काय सांगावं?

चंद्रकला—मी इतकी अविचारी नाहीं. परंतु त्या प्रियकराची भेट झाल्यापासून मी अगदीं वेडी होऊन गेलें आहें; मला कांहीं सुचत नाहीं. सदोदीत ती मूर्ती डोळ्यापुढं दिसते.

मालती—तुझ्या बाबाला जर हें समजलं तर कसं बरं होईल? त्यांना कांहीं हा प्रकार आवडणार नाहीं.

चंद्रकला—न आवडो. कारण—

पद.

(सुकुमार असुनी तूं फार)

हा प्राण, अर्पिला जाण, प्रभूचरणातें, प्रभुचरणातें ॥ ही मात तात आणि न्यात, छळिति कां माते ॥ छळि० ॥ संसार, सौख्य अपार,

पाहता सार, फार हें दिसतें ॥ फा० ॥ पति युवति, उभय गति, साम्य प्रीति ही जमते ॥ प्रीति ॥ सौंदर्य, आणिक ऐश्वर्य, मानशीं धैर्य शौर्य हें वसतें ॥ शौर्य ॥ नच भासे जगिं या दुजा पुरुष मज गमतें ॥ पु० ॥ हानेम, जो हलें प्रेम, दारिद्र्या हेम जणूं सांपडतें ॥ जणूं० ॥ तत्समान, बहुसन्मान करिन सुखि सातें ॥ करि० ॥ १ ॥

या करितां मी कोणाचीही भीती पाळणार नाहीं.

मालती—जनाची नको परंतु मनाची तर खरी?

चंद्रकला—सखे, आईबापांच्या ह्मणण्याप्रमाणं वागून मी आपल्या जन्माचं मातेरं कां करून घेऊं?

मालती—अग, वडील माणसं जी गोष्ट करतील ती कांहीं वाईट नव्हे हो. त्यांच्या पेक्षां कांहीं तुला जास्त समजत नाहीं.

चंद्रकला—सखे, स्त्री पुरुषाचा संबंध कांहीं चमत्कारिक रितिचा आहे; ज्याच्या जिवावर जन्म घालवायचा, तो जर मनायोग्य नाहीं तर सुख लागेल का?

मालती—तुझ्या पुढं बोलावं कुणी?

चंद्रकला—तुला काय वाटत असेल तें असो. परंतु माझ्या मनाची तर याप्रमाणं समजूत आहे. आणि मी आपला हेतु सिद्धीस नेईन, नाहीं तर प्राण ठेवणार नाहीं.

मालती—जसं तुझ्या मनास वाटेल, तसं कर, आमचं काय जातं त्यांत?

चंद्रकला—सखे तुझ्या अनुमोदनावांचून कांहींच करवणार नाहीं. कारण सर्व संकटांतून पार करणारी तूंच आहेस. मैत्रिणींनीं आपल्या मनुष्यांचें प्रिय करावें हा धर्मच आहे.

मालती—(गुरूस पाहून) सखे, ते पहा **गुरु**जी आले बरं ?

गुरु—(येऊन आसनावर बसतात.)

चंद्रकला—(नमस्कार करून बाजूस जाऊन बसतें)

गुरु—चंद्रकले, आज विजयादशमी आहे, याकरितां स्वच्छ कागदावर ईश्वर स्तुतीपर अशीं कांहीं वाक्यें लिही, आणि वचनांतील बोधाच्या कांहीं गोष्टी वाच. म्हणजे तुझी बुद्धि स्थीर राहील.

चंद्रकला—महाराज, मी गोष्टी वाचल्या आणि ईश्वरस्तुतीही लिहिली.

मालती—आतां तुला **गुरु**जींची पुजाकरायची? यांना—

गुरु—कां **मालती**, काय म्हणतेस ?

मालती—कांहीं नाहीं महाराज, आज विजयादशमी आहे, तेंव्हां **चंद्रकले**च्या पित्यानं आपल्याला पोषाख देण्याविषयीं तयारी करून दिली आहे. म्हणून **चंद्रकले**ला सांगितलं कीं, **गुरु**जींची पुजा कर.

गुरु—(मनाशीं) अहाहा ! आज पोषाख दिला ना ? एकंदरींत पहातां **चंद्रकले**च्या समाधानानें तिच्या बापाचें मन मजवर फार चांगलें आहे, आणि मीही **चंद्रकले**ला फार काळजी पुरस्कर शीकवीत असतों.

चंद्रकला—सखे, आण पूजेचें सामान कुठे आहे तें?

मालती—कोण आहे ग ती दासी?

दासी—(बाहेर येऊन) जी काय आज्ञा होते?

मालती—ते पोषाखाचं आणि पुजेचं ताट घेऊन ये.

दासी—होय महाराज हजर आहेत. (ती ताटें आणून ठेवते.)

मालती—ऊठ आतां चंद्रकले.

चंद्रकला—(उठून त्यास पागोटे बांधते शाल अंगावर घालून धोतरजोडा देते. व गळ्यांत हार घालून पागोट्यावर तुरा खोवतें)

गुरु—अहाहा! चंद्रकले, आज मी धन्य झालों, कारण माझ्या गृहीं येऊन तूं विद्या संपादन केलीस आणि तूं आपल्या पित्यास संतोषीत केलेंस त्यायोगानें मला हा पोषाख मिळाला. आतां सर्व लोकांत माझी प्रौढी झाली. ईश्वर तुझ्या पित्याचें अनंत कल्याण करो.

चंद्रकला—महाराज, नमस्कार करतें.

गुरु—चंद्रकले—

पद.

ईशाज्ञेनें तव मानशिचीं कार्ये सिद्धिस जावो ॥
प्रियपतिसह सत्कुमरा प्रसउनी अनुरागें
सुख होवो ॥ होईल या जगतीं ॥ मम आशिर्वादें कीर्ती ॥ १ ॥

(इतक्यांत चंद्रकांत राजपुत्र येतो.

चंद्रकांत—(मनाशीं) अहाहा!

पद.

(काय मला भूल पडली.)

वचन सत्य व्हावें ह्मणुनी शिघ्र पातली ॥ चंद्रकला रमणी सखी येथें बसली ॥ ध्रु० ॥ लग्नवस्तुलागिं सेवकासि धाडिलें ॥ साक्ष गंधर्व विधिस गुरुस वाहिलें ॥ यशद्यावे वक्रतुंड वंदी पाउलें ॥ कार्य सिद्ध व्हावयास युक्ति योजिली ॥ वचन० ॥ १ ॥

सखे, शाबास! स्त्रिया महाकपटी असतात, अशाविषयीं जी माझी समजूत होती ती आज नाहींशी झाली. धन्य आहें मी. आतां गुरुमहाराज या ठिकाणाहून जातील अशी तजवीज केली पाहिजे. तेव्हां (विचार करून) ठीक, बरीच युक्ती सुचली. (पुढें जाऊन गुरुजीस वंदन करीतो.)

गुरु—(आदरानें उठून) यावें महाराज, (त्यांस आसनावर बसण्यांस सुचवितो.)

चंद्रकांत—ठीक आहे. (गादीवर टेंकून बसतो.)

गुरु—आज मज गरिबावर फार उपकार झाले, महाराजांची दया ह्या वेळीं मला फार सुख देते, कारण हे चरण दृष्टीस पडण्याला महाप्रयास ते आज सहाजीक येथें आले यावरून माझें थोर भाग्य समजलें पाहिजे.

चंद्रकांत—सर्व विद्येचे स्वामित्व ज्या ठिकाणीं असेंत तेथें अज्ञ जनांनीं जाऊन सदोदित उपदेश घेतलाच पाहिजे, मग माझ्या येण्याचें कौतुक नव्हे.

गुरु—"ना विष्णुः पृथ्वीपतिः" या नियमानें पहातां आपल्याला योग्य तेंच बोलत आहांत.

चंद्रकांत—वाहवा. मी आपल्या चरणाचा दास आहें महाराज.

साकी.

नभीं तारापती कींवाचस्पती देवसभे माझारी॥
तैसे विद्या मुगुटमणी तुह्मी कीर्ती बहु या नग-
नगरीं ॥ सर्वही वानीती ॥ कोणी नच निंदा
करिती ॥ १ ॥

याप्रमाणें आपण थोर आहांत.

गुरु—आपल्यासारख्यांनीं मान दिला असतां आमची कीर्तीच आहे, कारण—

दिंडी.

पुष्पसंगतिनें थोरवी गुणाला ॥ येई ह्मणुनी
इश शिरीं वास झाला ॥ तसे प्रभु ज्यां नरा मान
देती ॥ तया सर्वहि जन सुखें वंदिताती ॥ १ ॥

चंद्रकांत—थोराचें वर्तन सदोदित असेंच असतें. महाराज माझी एक विनंती आहे.

गुरु—काय हेतु असेल तो सांगावा. मी मान्य करण्यास तयार आहें.

चंद्रकांत—आज—

साकी.

[illegible]। दानालागीं सत्वर मम गृहिं जावें॥

पूज्यमान बहू मानिती नगरीं बाहीलें सद्भावें ॥
आशा मम मनची ॥ आज्ञा ऐशी मातेची ॥१॥

याकरितां महाराजांनीं कृपा करावी.

गुरु—बरें आहे, महाराजांची आज्ञा उल्लंघन करणार कोण आहे ! आणि अशा आनंदाचे वेळीं मज गरीबाचें स्मरण झालें हा एक सुदीनच समजला पाहिजे. असो, आपण क्षणभर येथें बसावें. कारण **चंद्रकला** येथें आहे तेव्हां तिला एकटीला ठेवून मला जातां येत नाहीं.

चंद्रकांत—ठीक आहे, जशी गुरुची आज्ञा. (गुरु निघून जातात.)

चंद्रकला—(मनांत) केलेला विचार येथपर्यंत येऊन पोंचला. आतां पुढें सिद्धीस जाणें देवा तुझ्या स्वाधीन आहे. (लाजून सखीचा हात धरून बाजूस उभी रहाते.)

चंद्रकांत—प्रिये—

पद.

(प्रतिकुल होईल कैसा.)

काय मौन धरिशी आतां समय योग्य आहे॥
वचन सत्य करायातें आलो येथ पाहें ॥ ध्रु० ॥
गुरुलागिं यत्नें करुनी गोहिं पाठवीलें ॥ तुझे
बोल आजवरी नाहीं उल्लंघीले ॥ ह्मणूनि कां
अंतीं ऐसें यश दावियेलें ॥ निरक्षीरआलिं-
गन देई मज स्नेहें ॥ का० ॥ १ ॥

आतां कोठपर्यंत वाट पाहणार.

मालती—सखे, कपिलाशष्ठीची पर्वणी कांहीं वारंवार येत नाहीं. इतकावेळपर्यंत तूं अगदीं वेडी होऊन गेली होतीस, तर आतां महाराजांचा सत्कार करून सुमूहूर्तानं वचनाचा नेम होऊं दे.

चंद्रकला—हेग काय! यांत मला कांहीं समजत नाहीं जा.

मालती—मीही जा या शब्दाचीच वाट पहात होतें. आतां माझं काम झालं (जाऊं लागते.)

चंद्रकला—सखे, मला एकटीला सोडून तूं जाणार ना?

मालती—सकलजनाचे पालनकर्ते ह्या ठिकाणीं असतां मी कशाला पाहिजे! त्यांतून चक्रवाक पक्षाच्या प्रीतीमध्यें नुसतं पान आडवं आलं तर तें सहन होत नाहीं. मग मी इथं राहिल्यापासून उभयतांनाही संकोच नाहीं कां?

चंद्रकला—हेग काय असं भलतंच बोलतेस!

मालती—तूं तरी काय करशील! जें पाहिजे तेंच पुढं येतं. मनांतून तर सर्व आहे, परंतु उगीच ओढून चंद्रबळ आणायचं.

चंद्रकला—जातेस कुठं तूं?

मालती—लांब जात नाहीं मी जवळच आहे मात्र दृष्टीआड (निघून जातें)

चंद्रकला—सखे, खरच कां गेलीस?

चंद्रकांत—हे हृदयंगमे, आतां संकोच कशाला पाहिजे (तिचा हात धरितो.)

चंद्रकला—महाराज, नुकताच आपला प्रीतिसंगम

आहे; याकरितां एकाएकीं कोणतीहि गोष्ट करण्यास संकोच वाटतो.

चंद्रकांत—एकांत स्थळीं जर संकोच धरला, तर सुख कोठून होणार.

चंद्रकला—(गळ्यास मिठी मारून) भीड आहे कुठे ? आपल्याकडून आज्ञा होण्याचा उशीर. महाराज, आजचा सुदीन मला किती सुखकर वाटतो ?

पद.

(साध्य नसे मुनिकन्या.)

तोष मनीं बहु झाला ॥ प्रभुचा सुखकर संगम घडला ॥ ध्रु० ॥ मधुप जसा प्रीतिस्तव कमलीं ॥ मधु पाहुनी मक्षिका रिझली ॥ शशिनें मोद निधीला ॥ तेवीं मम भाग्य-ठेवा उदेला ॥ तोष० ॥ १ ॥

चंद्रकांत—प्रीये—

चाल सदर.

अहि गुंगे जेवीं वेणुरवानें ॥ स्वेच्छ क्रिडा सजुनी मोहानें ॥ तदुपरी मानी मनाला ॥ मी तव करीं मम प्राण हा दिधला ॥ तोष० ॥१॥

चंद्रकला—अहा जिवलगा ! आपल्या प्राप्तीविषयीं मी बहुत दिवस इच्छा करीत होतें.

चंद्रकांत—सखे, तुझ्या स्वरूपाविषयींचें वर्णन एका साधुनें केल्यावरून मला फारच मोह उत्पन्न झाला.

चंद्रकला—हो, बरी आठवण झाली. त्या साधूनें मला असा शाप दिला होता—

चंद्रकांत—तो कोणता?

चंद्रकला—(त्याच्या कानांत सर्व गोष्ट सांगते) त्यामुळें असा प्रकार घडला.

चंद्रकांत—फार चांगलें झालें. तो शाप या वेळीं वराप्रमाणेंच फलास आला.

चंद्रकला—महाराज, आपल्यास मी विनंती केली होती, त्याप्रमाणं आपण आलांत खरे, परंतु ब्राह्मणाला बोलावलं नाहीं वाटतं.

चंद्रकांत—असें कधीं होईल काय? ती सर्व तयारी मी करून आलों आहें. आतां ब्राह्मण येईल.

चंद्रकला—जिवलगा एकवार माझ्या मनासारखी गोष्ट झाली म्हणजे मग मी कुणालाही भीत नाहीं.

चंद्रकांत—सखे, कांहीं काळजी करूं नको, याकरितां नानाप्रकारचे जरी प्रयत्न लागले, तरी मी करीन, परंतु तुझा अंगीकार करण्याविषयीं जी प्रतिज्ञा केली ती कधींही व्यर्थ होऊं देणार नाहीं तुझ्या वांचून—

पद.

(नच सुंदरी करूं कोपा.)

जग शून्याचि मज भासे ॥ तव विरहें तनु त्रासे ॥
प्रेमानें निशिदिनीं मूर्ती हृदीं विलसे ॥ ध्रु० ॥
पळ पळ युगसम तें ॥ वाटे सर्वही निष्फळतें ॥
शयनीं निद्रेतें ॥ येऊनी भंगिसि मानस ते ॥

धिर नच कामातें ॥ जडला हृद्रोगाचि
धन्वतरि होऊनी दे सौख्य राजसे ॥ त

चंद्रकला—प्राणनाथ, आपली अशी अवस्थ
करितां होते, ह्मणून मींही प्रतिज्ञाच केली

पद.

(नृप ममता रामा वरती.)

निज वास रवीचा सुटला ॥ सिंधू जरि
ला ॥ जिवलगा ॥ द्विज मन विटलें वेद
फणिवर त्यागी या महीला ॥ जिव
शांतता येई अग्नीला ॥ दाहकता या चं
॥ जिवलगा ॥ चाल ॥ ये तरी ॥ सत्य
कंठ हा जरी ॥ धरूनिया चिरला ॥
गीं मी नेमाला ॥ जिवलगा ॥ १ ॥

चंद्रकांत—अहाहा! सखे, या तुझ्या निश्चयानें
शांती झाली. यापेक्षां आणखी मी कांहीं
नाहीं.

(इतक्यांत पडद्यांत शब्द होतो.
निनी' प्रियाच्या आलिंगन सुखांतून लौकर
हा तुझा पिता इकडेसच येत आहे असें वांटें
करितां मनाला धीर देऊन बाजूस हो.)

चंद्रकला—प्रियकरा, माझी सखी काय सुच
हिलंतना! याकरितां आपण उभयतांही
नाहींशीं होऊं ह्मणजे झालं.

चंद्रकांत—ठीक आहे. (निघून जातात.)

(इतक्यांत **बुद्धिमतिका** नांवाची दासी प्रवेश करिते.)

बुद्धिमतिका—काय बाई करावं? हा विनाकारण मजवर दोषारोप होणार आहे. बरं, त्यांच्या कानांवर ही गोष्ट घालावी तर ज्यांच्या सेवेंत आजपर्यंत दिवस घालविले त्यांचा आतां मनोरथ पूर्ण होण्याचा समय आला असून अशा अमृतामध्यें मी विष कालवूं काय? (विचार करून) कांहीं होवो, माझ्या धन्यानं मला मारलं तरीं चिंता नाहीं, परंतु आजपर्यंत **चंद्रकांतमहाराजांबरोबर चंद्रकला** बाईसाहेबांची झालेली प्रीति ही हकिगत अगदीं कळवितां कामा नये. त्यांतून उभयतांचा योग्य जोडा पाहून मला तर काय, परंतु सर्वत्रांना सुद्धां प्रिय होईल, मग त्या माझ्या धन्याचे मनास काय येतें कोण जाणें. अशा प्रतिबंधामुळं स्त्रिया कुठं राहिल्यात काय? त्या अबला जरी आहेत तरी मनांत आणतील तर महाप्रबलाला सुद्धां स्वस्थ बसवितील. (इतक्यांत **दुर्गा** नांवाची दाशी येते.)

दुर्गा—अग बुद्धिमतिके, तुला बाईसाहेबांनीं काय सांगितलं आणि तूं इथंच का अझून उभी आहेस?

बुद्धिमतिका—कांग काय झालं?

दुर्गा—अग, शाळेमध्यें बाईसाहेब आणि **चंद्रकांत** महाराज यांची भेट होऊन जो प्रकार झाला तो सर्व बाबांना कळला.

बुद्धिमतिका—मग पुढं काय झालं?

दुर्गा—व्हायचं काय? बाबांनीं **चंद्रकला** बाईसाहेबांसह सर्व कुटूंबांतील माणसं घेऊन **रत्नपुरास** जाण्याचा निश्चय केला. उद्यां निघण्याची तयारी ठरली.

बुद्धीमतिका—तिथं जाऊन काय करायचं?

दुर्गा—बाबांनीं त्या नगरचा सावकारपुत्र वर योजिला आहे, आणि त्यांबरोबर बाईसाहेबांचा विवाह करून द्यावा असा बेत केला आहे.

बुद्धिमतिका—गडे, ही गोष्ट फारच वाईट झाली. आतां **चंद्रकांत**महाराजांबरोबर जडलेलं प्रेम तें बाईसाहेबांस येथून कसं जाऊं देईल?

दुर्गा—त्याचीच मोठी पंचाईत आहे. त्यांचा तर निश्चय आहे कीं, तसा प्रकार झाल्यास मी प्राण देईन.

बुद्धिमतिका—खरंच गडे, संसारांत पती मनायोग्य नसल्यास स्त्रियांचं जिणं व्यर्थ नव्हे कां?

दुर्गा—याकरितांच बाई साहेबांनीं मला एक कामगिरी सांगितली आहे.

बुद्धि०—अशीं कोणती कामगिरी सांगितली?

दुर्गा—उद्यां रत्नपुरांस जायचं आहे, म्हणून **चंद्रकांत** महाराजांस पत्र दिलं आहे तें त्यानां नेऊन देण्याकरितां मी जातें.

बुद्धि०—आतां त्यांची भेट तरी कशी व्हावी कोण जाणें?

दुर्गा—आज किनी संध्याकाळीं देवीच्या दर्शनाकरितां बाईसाहेबांनीं जाण्याचा निश्चय केला आहे. तिथंच त्यांना बोलाविलं आहे.

(पडद्यांत—अगे बुद्धिमतिके, बाईसाहेबांना देवीच्या दर्शनाकरितां जायचं आहे, तर चल लौकर).

बुद्धिमतिका—अग बाई! तूं जा हो लौकर, बाईसाहेब देवीला जाण्याकरितां निघाल्या.

दुर्गा—निघाल्या काय? त्या इकडेसच येत आहेत पहा. आता मला रागं भरतील तर मी जातें. (निघून जाते इतक्यांत **चंद्रकला** प्रवेश करीते).

चंद्रकला—कांग **बुद्धिमतिके** कुठंग गेली होतीस?

बुद्धिमतिका—बाईसाहेब, बाबासाहेबांनीं बागेंत जायला सांगितलं होतं ह्मणून तिकडे निघालें होतें.

चंद्रकला—खरंच कां? मग जा हो. पण कायग काम आहे?

बुद्धिमतिका—माळ्याला बोलवायला सांगितलं आहे.

चंद्रकला—येतांना चांगली फुलं घेऊन ये बरं का?

बुद्धि०—बरं आहे. (निघून जाते).

चंद्रकला—काय करूं?

पद.

(तव मानस कैसें न कळे.)

मम मानस झाले लीन प्रभूच्या प्रीतीला ॥
जणु धावें उपवनीं मृग त्वरे जलपानाला ॥ध्रु०
मायबाप मज गांजिती परी स्मरघायें व्याकुळ फार गे ॥ जगदंबे तव पदीं लक्ष असे तापकरी परिहार ॥ दावी पदकमला ॥ १ ॥

हे अंबिके, यांत जर आमचे हातून पातक होत असेल तर शिक्षा करणारी तूंच आहेस मातें स्त्रीयांचं दैवत पती, त्याबरोबर आपला सर्व जन्म घालवयाचा तोंच जर मनायोग्य नाहीं, तर काय उपयोग. आतां धर्माविरुद्ध माझ्या हातून हं कर्म होत आहें असेंहि नाहीं. तर अशावेळीं तूंच साह्य हो. कदाचित् आमचं कृत्य तुला वाईट दिसत असेल तर तूं जगत्‌जननी आहेस याकरितां मला अपराधाची क्षमा कर कारण—

पद.

(व्यर्थ मी जन्मले थोर कुळी.)

कष्ट हे फारची होति मला ॥ मानला सुंदर दावी हिला ॥ ध्रु० ॥ जल विरहित मालतिची वेली ॥ शुष्कदशा तिजला ॥ १ ॥ स्वासांबू जरी नाहीं चातका ॥ सा परी मी आबला ॥ २ ॥

हे देवी, आई बाप माझ्या जन्माचे वैरी होऊन एका अविद्वान अविचारी आणि कुरुप अशा सावकार पुत्राबरोबर लग्न करून देण्याचा विचार करून रत्नपुरास जाण्याची तयारी करीत आहेत. त्याच्या बरोबर राहून जन्मभर दुःख भोगण्यापेक्षां मरण आलं तर बरं. मुलीचे आईबाप कांहींच विचार करीत नाहींत.

साकी.

तात मनीं विद्वत्ता जननी इच्छी धन जामाता ॥
बंधुवर्गि सुकूल इतर जन मिष्टान्नें सेविता ॥
मोदित वधु मनते ॥ भुलतें पतिच्या रूपातें ॥

पैसा असून करायचं काय! चतुरता नाहीं. विलास नाहींत. शृंगारपर सुसंवाद नाहीं, तर काय उपयोग? यापेक्षां हें रूप मला दिलं नसतस तर बरं होतं. चंद्रकांत महाराज वाईट का आहेत? परंतु बाबाच्या मनांत काय आलं कोण जाणें. नाहीं तर त्यांच्या सारखा चतुर आणि शाहणा या नगरींत पुरुष आहे कोण? इतकंहि असून राज्यवैभवानं युक्त अशाच्या बरोबर विवाह न करितां त्या मूर्खाला देण्याचा विचार केला. म्हणून हे माते, ही दीन झालेली कन्या तुला अनन्य शरण आहे, तर सर्व अपराधांची क्षमा करून चंद्रकांत महाराज पती मिळतील अशी कृपा कर. (विचार करून) काय करावं? प्रियकराला मी लौकर देवळांत या ह्मणून पत्र पाठविलं आहे, तर ते त्या ठिकाणीं आले असतील; याकरितां आपण लौकर जावें. आणि त्यांची भेट घ्यावी. बरं, मालतीहि अद्याप कां बरं आली नाहीं? तिला मी सांगितलं होतं कीं, मागें काय प्रकार होतो तो पाहून तूं लौकर ये. (पडद्याकडे पाहून) अहाहा!

सखी इकडेसच येत आहे—(**मालती** येते) क
ग उशीर लागला?

मालती—सखे **चंद्रकले,** बाई, मार्गे किनी तुझे बा
ह्मणूं लागले भलत्याच वेळीं देवदर्शनाला क
य जायचं? कुठे ती पोरगी! असे शब्द बोलू
मजवर फार रागावले.

चंद्रकला—आणखी कांहीं बोलले का?

मालती—तें काय सांगूं! तें इतकं सुद्धां म्हणाले कीं
चंद्रकला तुझ्याच संगतीनं बिघडली, (खिन्न वद
करून उभी राहते.)

चंद्रकला—अग बाई, हेंग काय? सखे, इतकं व
ईट तें काय वाटलं? बाबा बोलले तरी त्यांचा आ
ला आतां थोडाच वेळ संबंध आहे असं सम
प्राणप्रियाची भेट झाली कीं, मीं त्यांच्या हात
मनासारखी गोष्ट कबूल करून घेतल्यावांचू
त्यांना सोडणार नाहीं. एकदां जी घरांतून बाहे
पडलें ती पुनः घरांत जाणार नाहीं.

मालती—नको गडे, अशा भलत्या विचारानं प
णाम चांगला होणार नाहीं.

चंद्रकला—माझं जेणेंकरून हित होईल ती गो
मी करणार; त्यांत बाबांचं काय ऐकायचं!

मालती—जसं तुझ्या ध्यानांत येईल तसं कर.

चंद्रकला—आतां किनी देवीच्या देवळांत महारा
आले असतील, तर चल आपण जाऊं. (इतक्य

पडदा उघडतो तो देवळांत चंद्रकांत निजलेला आहे.)

मालती—सखे, ते पाहिलेस का महाराज येऊन तुझी वाट पाहून थकले असल्यामुळं निजून राहिले आहेत.

चंद्रकला—(जवळ जाऊन) प्रियकरा, इतका विनोद भलत्याच वेळीं काय कामाचा बरं ?

पद.

(वाळा जाइ परतोनी.)

नाथा निद्रित कां झालां ॥ पुरे हाल मी बहुत त्रासलें ॥ व्यर्थ कसा मनीं रोषचि धरिला ॥ ध्रु० ॥हृदीं नेत्रीं शिरस्थानीं नमिला ॥ भुललें मी त्वत् प्रेमाला ॥ तुच्छ सकल वस्तू रूप मजला ॥ गमति भाव यौवन सौख्याला ॥ नच इच्छित मी अन्य कोण ते कुरवंडीही करिन कायेला ॥ १ ॥

अग बाई! ही अशी कशी निद्रा! (त्यास हालविते.) काय बाई दैव चमत्कारिक आहे! ह्या वेळीं प्राणनाथांना कशी निद्रा लागली? मला असं वाटतं.

पद.

(व्यर्थ आह्मी अबला.)

फिरली दैवगती ॥ खरेंच सखे ॥ ध्रु० ॥ शुभ घडी येई परि सामर्थ्यें ॥ विघ्नें कां नडती॥ खरेंच० ॥ १ ॥ थकलें कीं मम नेत्र रडोनी ॥

व्यर्थ जिणें जगतीं ॥ खरेंच० ॥ २ ॥ नच ठेवावा प्राण वाटतें ॥ कैची ये सुगती ॥ खरेंच० ॥ ३ ॥

जिवलगा, इतका राग कोणता आला? आपण मजबरोबर कां बोलत नाहीं? मी आपला अपराध कोणता केला ह्मणून मज अबलेवर अबोला धरून ह्या क्रोधाग्नीचा वर्षाव करितां?

मालती—सखे चंद्रकले,दुःख करूं नकोस. हा विपरीत दैवाचा प्रकार जरी या रीतीनं घडला तरी तुझा जर निश्चय आहे, तर मनासारखं न होण्याला झालं काय?

चंद्रकला—गडे, आतां असे किती दिवस मी दुःख सहन करून राहूं? आणि एकदां येथून गेल्यावर ही सुकुमार तनु माझ्या पुनः केव्हां दृष्टीस पडेल?

मालती—अग तूंच काय! पूर्वी देवादिकांत सुद्धां असे प्रकार पुष्कळ घडले. त्यांना सुद्धां अशींच विघ्नें येत होतीं. परंतु निश्चय असला म्हणजे झालं.

चंद्रकला—आतां आणखी कोणत्या रितीचा निश्चय करूं?

मालती—मला एक गोष्ट सुचली आहे ती सांगूं कां तुला?

चंद्रकला—काय काय, सांग पाहूं?

मालती—दुसरं काय महाराजांना तूं जाणार या गोष्टीचा राग आला असेल ह्मणून बोलत नसतील, असं तर नाहीं?

चंद्रकला—छेग! ही गोष्ट कांहीं नाहीं. हें माझं दैव आड आलं, असो. या चरणांचा आश्रय सोडून मला अन्य वस्तू प्रिय नाहींत. आणि खरोखरच माझा निश्चय आहे कीं, एथून मी जाणार नाहीं, त्यांतून बाबांनीं जर मला बळंच नेलं, तर मी महाराजांची एक मासपर्यंत वाट पाहून नंतर प्राणत्याग करीन. परंतु इतर ठिकाणीं मन जाऊं देणार नाहीं.

मालती—सखे, ईश्वर तुझे हेतू पुरवो, व तुह्मी दोघें आनंदांत विलाससुख भोगाल हें पाहून आह्मी तुझ्या मैत्रिणी आनंद मानूं.

चंद्रकला—असा दिवस येईल तेव्हां ना?

मालती—अग, दुःखांतीं सुख असं शास्त्रांत सांगितलं आहे, मग तुला नाहीं कां सुख मिळणार?

(इतक्यांत एक **बुद्धिमतिका** नांवाची दासी येते.)

कांग? इतकी घाबरल्यासारखी कां आलीस?

बुद्धि०—बाबासाहेब फार रागावले आहेत, आणि कुणीकडे **चंद्रकला**बाईसाहेब गेल्या ह्मणून शोध करूं लागले. मला विचारितां मी त्यांना सांगितलं मला माहित नाहीं.

चंद्रकला—तू सांगावंस किनी बागेंत गेली आहे ह्मणून?

बुद्धि०—तें कांहीं मी सांगितलं नाहीं. आणि तुह्मांस इकडे सुचविण्याकरितां आलें तर लौकर चला, नाहीं तर काय होईल कोण जाणें बाई!

चंद्रकला—(चंद्रकांताजवळ खिन्न होऊन बसते.
मालती—सखे, अशी खिन्न होऊन कां बसलीस
आतां लौकर घरीं गेलें पाहिजे.

पद.

(राग भैरवी ताल दिपचंद)

काय करूं सखे चैन पडेना ॥ प्राणप्रियाविण
मजला गमेना ध्रु० ॥ निद्रा कशी ही वैरिण
झाली ॥ चक्रवाकीपरी विरह साहिना ॥ १ ॥
जातील मत्प्राण खचितची वाटे ॥ कामान
जाळी तनूसदना ॥ २ ॥ गेलें जरी मी येथुनि
आतां ॥ कैसें मम वृत्त समजे त्यांना॥ ३ ॥

चंद्रकला—(श्वासोच्छास टाकून) गडे, मला आत
कांहीं सुचत नाहीं. (त्यांच्या आंगावर आंग
टाकून मुर्छित होते.)

मालती—(तिला सावध करून) सखे, असं वेड्यासा
रखं काय करतेस? आतां तूं इथं आल्याविषयं
कांहीं तरी खूण त्यांच्या जवळ ठेवून जो तुझ
निश्चय असेल तो त्यांना समजेल अशा रीति
लिहून ठेव. ह्मणजे सर्व गोष्टी सुफलित होतील
आणि तूं या वेळीं घरीं चल. रात्र होऊं लागली
पुनः घरीं गेल्यावर बाबा रागावतील. तो एव
त्रास आहेच.

चंद्रकला—नको नको! मला आतां कांहीं प्रिय वा
टत नाहीं. हे प्राणसुद्धां नकोसे वाटतात.

मालती—माझं नाहीं कां ऐकायचं?

चंद्रकला—तूं सांगशील तशी वागण्यास मी तयार आहें.

मालती—मग तूं त्यांच्या हातावर डोळ्यांतील काजळानं लिहून ठेवून चल कशी.

चंद्रकला—ठीक. (त्याच्या हातावर लिहून ठेवते.) जिवलगा, ह्या लेखांतील भावार्थ मनांत आणून लौकर या.

मालती—चल आतां. (निघून जातात.)

(तदनंतर कांहीं वेळानें तो जागृत होऊन इकडे तिकडे पहातो.)

चंद्रकांत—काय प्रियेनें! मला येथें या ह्मणून सांगून अद्याप ती कां बरं आली नाहीं. सखे, तुजसाठीं मी या ठिकाणीं येऊन वाट पहात बसलों असतां त्वां इतकें निष्ठुर व्हावेंस ना? (इकडे तिकडे पहातां हातावर नजर जाते. पाहून) हें काय बरें माझ्या हातावर लिहिलें आहे? (निरखून पहातो) अहाहा! प्रिया या ठिकाणीं आली होती खरी, परंतु माझ्या दुर्दैवानें मला निद्रा लागली; त्यामुळें निराश होऊन गेली त्या वेळीं तिनें हें मला समजण्याकरितां लिहिलें आहे. असो. काय लिहिलें आहे तें तर एकवार वाचून पाहूं. (वाचतो)

पद.

(जहाली अहो राजेंद्रा हरिश्चंदा.)

रविवंशोद्भव भूपाला तव अबला विनती क-

रिते ॥ दिलें जैसें वचन तैसें पाळा दिनां तें ॥ ध्रु० ॥ जरि वियोग राज धनाचा ॥ किंवा परमित सौख्याचा ॥ प्रिय मित्रादिक आप्ताचा ॥ किंवा साधुसंताचा ॥ आणीकहि निज जननीचा ॥ घडला तरि न गणा साचा ॥ समयीं योगा घेऊनि यावें रत्नपुरातें ॥ १ ॥

अहाहा ! किती हें प्रेम! आणखी काय ह्मणतेस?

पद.

(परिसा रघुवीर नाश तिमिर.)

जागविलें बहू परि मन अशा इच्छा दग्धचि झाली ॥ उत्सह येतांना मनिं होता वियोग खंती घडली ॥ तातासह मज जाणें न चुके नाहीं कोणिही वाली ॥ एक मास तव आस बघुन मग त्यागिन देह अकालीं ॥ १ ॥

काय करावें? इतका निर्दय मजवर होऊन, त्या कामलतिकेच्या आलिंगनसुखास या वेळीं मी पराङ्मुख झालों !

पद.

(जाते कीं मम शकुंतला ही.)

दैवा कैसा घात करून त्वां प्रिया विन्मुख केलें ॥ अपराधाविण कमला जैसें वज्रें दंडयेलें ॥ ध्रु० ॥ राज्यसुखादिक उपभोगाची इच्छा मनिं नाहीं ॥ व्यर्थ जिणें या रमणीवाचुनी

**न सुचे मज कांहीं ॥ आम्रवल्लिपरी मृदु ह-
स्तानें आलिंगिलें देहीं ॥ मंद स्मित भ्रूव-
क्रकटाक्षें मत् चित्ता हरिलें ॥ १ ॥**

मला कोठून ही काळ निद्रा आवरलीस? सर्वस्वी घात झाला.

आतां व्यर्थ जगण्यापेक्षां प्राण द्यावा हें बरें. (कट्यार काढतो) हे शस्त्रा, अंतःकाळीं तूंच माझा साथी झालास काय? असो. या जन्मीं प्रिया मिळत नाहीं. परंतु पुढले जन्मीं तरी तिची माझी प्रीति होऊं दे. (विचार करून) अरे पण प्रियेनें काय सुचविलें कीं, मी एक मास मार्गप्रतीक्षा करून आपण आलां नाहीं तर प्राण देईन. तर तिच्या वचनाप्रमाणें तिला एकवार भेटलें पाहिजे. कितीही प्रसंग आले अथवा मजकरितां योगसाधन जरी करावें लागलें तरी करा. परंतु मला भेट द्या असें जर तिनें लिहून ठेविलें तर तेंच वचन सत्य केलें पाहिजे. आतां सर्वसंग परित्याग करून योगी वेष धरून सखीच्या भेटी करितां जावें हेंच उत्तम.

साकी.

मनोरथाची होईल सिद्धी ऐसें मजला गमतें ॥

प्राणांता समयीं मनुजातें किंचित पीयुषलतें ॥
जैसा वृक्षाला ॥ वसंतीं नूतन बहर आला॥१॥

अंक ४ था समाप्त.

अंक ५ वा.

—∞*()*∞—

(तदनंतर योगीवेष घेतलेला चंद्रकांत प्रवेश करतो.)

चंद्रकांत—प्रियेच्या लेखाप्रमाणें योगीवेष घेऊन निघालों तर खरा, परंतु हा मदन किती तरी मला छळतो बरें!

पद.

(राग कालिंगडा ताल धुमाळी.)

मदना रतिसुखसदना पिडिशी कां रे दिनाला ॥ निशापती अरे शीत असुनी तूं जाळिशि कां मम तनुला ॥ ध्रु० ॥ हस्तांजलीपुट बद्ध करूनी ॥ शरण तुम्हां शिव अरिला ॥ म० ॥ ॥ १ ॥ परदेशी हा मंदभाग्य मी ॥ नये दया कां तुजला ॥ म० ॥ २ ॥

काय करूं? ह्या यातना जिवाला सहन होत नाहींत; तर हे चारुशीले, तुझीही अवस्था मजप्रमाणेंच झाली असेल. तूं तरी काय करशील? पित्याच्या सत्तेपुढें तुझें तरी काय चालणार! इतकेंही असून देवीच्या देवळांत मला भेटण्याक-

रितां आलीस, परंतु मीच अभागी! तुजकडे तरी काय बोल आहे! (विचार करून) आतां त्या रत्नपुराचा मार्ग कोणिकडे आहे याचा शोध केला पाहिजे. आणि तिची भेट लौकर घेतली पाहिजे. (चंद्रकलेचें रूप ध्यानीं आणून) अहाहा! काय ती मनमोहक मूर्ती! ज्या वेळीं तिनें मला प्रेमभाक दिली त्या वेळीं तिनें आपलें हृद्गत मला पूर्ण दार्शित केलें. सखे, खरोखर तुझ्या सारखी स्त्री या त्रिभुवनांत शोधून पाहिली तरी मिळणार नाहीं. आतां तुझा शोध मला कोण सांगेल?

पद.

(सुखवी नयन किती.)

तरु पशु पक्षी सांगा मजला ॥ देखिली नयनीं चंद्रकला ॥ ध्रु० ॥ तृषित जसा मृग जल आशेनें ॥ त्यापरि फिरलों मोड जहाला ॥ १ ॥ अवयव सखिचे पाहुनी सकळी ॥ ग्रासिली भागे नकळे तिजला ॥ २ ॥ ईश अवकृपें कृश जहालों ॥ स्मरवन्ही या जाळी तनुला ॥ ३ ॥

काय! माझी दया कोणालाच येत नाहीं काय? अरेरे! सर्वच मजवर राग धरून स्वस्थ बसले तर आपण आतां विचार करून उपयोग नाहीं, मार्गे क्रमीत पुढें गेलें पाहिजे. (चालूं लागतो इतक्यांत दोन मार्ग पाहून) आतां ह्या ठिकाणीं

कोणत्या मार्गानें जावें ह्याचा विचार पडला. माझी प्रिया ज्या नगरांत आहे तो मार्ग कोणता हें मला आतां कोण सांगेल ? (इकडे तिकडे पाहून) अरे पण हें ह्या ठिकाणीं कांहीं लिहिल्याप्रमाणें दिसत आहे ! (नीट पाहून) हीं माझ्या प्रियेचींच अक्षरें आहेत यांत संदेह नाहीं. काय बरें ह्मणत आहे ती ?

पद.

(राग मालकंस ताल त्रिवट.)

वाममार्गिं या रत्नपुराशीं ॥ निश्चय हाची मनाशीं ॥ध्रु०॥ लेख तुम्हा मम ग्रंथि व्हावया ॥ मानुनी या वचनाशीं ॥ वा० ॥ १ ॥ प्राण आण ही जाणुनि चित्तीं ॥ संरक्षा अबलेशीं ॥ वा० ॥ २ ॥

अहाहा ! हे मनोरमे, किती तरी तुला मजकरितां कष्ट सहन करावे लागतात !

(चाल सदर)

प्रेम नेम पाहून तुष्टलों ॥ हेम दरिद्री जनाशीं ॥ वा० ॥ ३ ॥ सूज्ञपणें त्वां सत्व रक्षिलें ॥ कारण मी दुःखाशीं ॥ वा० ॥ ४ ॥

असो, आतां पुढें हा नदीप्रवाह आहे, आणि सुंदर बगीच्याही दिसतो, तर तेथें जा-

ऊन क्षणभर विश्रांती घ्यावी आणि शोध करावा. (पुढें जाऊन) अहाहा ! हें स्थान किती रमणीय आहे !

पद.

(चाल—सौमित्र वीर रघुविरास काय बोलला.)

या सौख्यस्थानिं चंद्रकला कोठें प्रियसखी ॥ उत्सुक मन भेटिविना जहालें दुखी ॥ सव्य नयन भाग्योदय दावितो सुखी ॥ रामा ती दावि प्रभू नमित तूजला ॥ पाहूनि हा आराम मनीं तोष जहाला ॥ १ ॥

हें रमणीय स्थान विलाससुखाकरितां कितियोग्य आहे ! परंतु मी एकटा ह्या ठिकाणीं असल्यामुळें मला हें दुःखद भासतें. काय करावें! देवा, आतां मात्र दुःख देऊं नकोस. कारण, मी बहुत त्रासलों आहें. तर क्षमा कर, तुला अनन्य भावानें शरण आहें. (असें ह्मणून वृक्षास टेंकून बसतो.)

(तदनंतर **फुली** व **गजाऊ** अशा दोन दासी पाण्याचे कुंभ घेऊन प्रवेश करितात.)

फुली—कांग **गजाऊ**, मघांपासून तूं कुठं गेली होतीस?

गजाऊ—कुठं नाहीं ग, कांहीं कामाकरितां बागेंत गेलें होतें.

फुली—तें कां? आज बागेंत काय असं काम होतं?

गजाऊ—अग, सारा दिवस काम करून करून जीव अगदीं थकून जातो आणि विश्रांती कशी ती मि-

ळत नाहीं ह्मणून तिथं थोडा वेळ जाऊन निवांत बसलें होतें.

फुली—बरं, आज बाईसाहेब ग बागेंत कशाला गेल्या होत्या?

गजाऊ—तें कांहीं मला माहीत नाहीं.

फुली—आणि असलें तरी तूं कशाला सांगशील?

गजाऊ—खरंच बाई, मला हें कांहीं माहीत नाहीं. नाहीं तर सांगायला काय झालं?

फुली—बाईसाहेबांची प्रकृती आतांशी अगदीं बिघडत चालली आहे. खाणं पिणं सुद्धां त्यांनीं वर्ज्य केलं.

गजाऊ—इतका प्रकार होण्याचं कारण काय बरं?

फुली—गडे, ह्या गोष्टी तुला माहित असून माझ्या बरोबर चोरून ठेवतेस हें बरोबर नाहीं. तूं सदोदित त्यांच्या तैनातीस असतेस असं असून कां तुला माहित नसणार?

गजाऊ—त्यांनीं आह्मांला सांगितल्यावांचून कसं समजेल?

फुली—अग आतांशी मी पाहतें तर त्यांच्या तोंडावर बिलकूल तेज दिसत नाहीं. काय दुःख असेल तें असो.

गजाऊ—लग्न झालं नाहीं याचीच काळजी, दुसरं काय? बायकांचा जन्म फार खोटा; त्यांतून थोरा मोठ्यांच्या नांवलौकिकाप्रमाणं सर्व गोष्टी घडल्या पाहिजेत. आपल्या सारखं का आहे? लग्नाचा बेत म्हणजे तीन दिवसांत आटपतो.

फुली—गडे, हें कांहीं कारण नाहीं. परवां बाबासाहेबच ह्मणत होते कीं, या मुलीचं लक्ष त्या राजपुत्राकडे लागल्यामुळं ही अगदीं शुष्क कमलनीप्रमाणं दिसूं लागली.

गजाऊ—काय असेल तें त्यांचे त्यांना माहीत.

फुली—**गजाऊ**, तूं किनी फार खोल मनाची बायको आहेस. तुझं इंगीत एकाएकीं कुणालाही समजणार नाहीं. अग, माझ्याजवळ सांगितलंस तरी मी कांहीं कुठं बोलणार नाहीं हो. आणि जरी न सांगितलंस तरी समजल्या शिवाय राहील का?

गजाऊ—अग नाहीं म्हणतं कोण?

फुली—मग सांगायाला काय झालं?

गजाऊ—गडे, मला किनी सांगायाला भिती वाटते, कारण, हे कुणाला समजलं तर विनाकारण बाईसाहेबांचा मजवर राग होईल.

फुली—मी कुणाजजवळ बोलेन असं कां तुला वाटतं?

गजाऊ—तसं नव्हे. सहज गोष्टी निघतांना मनुष्य बोलून जातं.

फुली—असं माझ्या हातून नाहीं हो होणार.

गजाऊ—बाईसाहेबांनीं किनी **चंद्रकांत** महाराजांस इथं बोलावलं आहे, व एक महिन्याची मुदत दिली आहे. ते जर आले तर बरं, नाहीं तर जीव ठेवायचा नाहीं.

फुली—अग बाई! इतकी कां प्रतिज्ञा आहे!

चंद्रकांत—(मनाशीं) काय बरं हा चमत्कार! ह्या

दासी आपसांत बोलत असतां माझें नांव घेतात तेव्हां माझ्या प्रियेच्या तर नसतील? परंतु आपण होऊन जर विचारलें, तर न जाणो तिच्या बापाला समजून पुनरपी कार्यांत व्यत्यय येईल. याकरितां ह्यांचीं आणखी काय बोलणीं होतात तीं स्वस्थ ऐकावींत, व तसा संबंध दिसल्यास मग आपण येथें आलों आहों हें वर्तमान कळविण्याविषयीं यांना सुचवावें.

गजाऊ—अग प्रतिज्ञाच काय, शृंगारपुराहून आल्या दिवसापासून त्यांनीं अगदीं अन्नच वर्ज्य केलं. सदा एकांतांत बसून विचार करीत असतात.

फुली—पण आतां हा योगायोग यावा कसा आणि त्यांचे हेतु पूर्ण व्हावेत कसे?

गजाऊ—**चंद्रकांत** महाराज आले ह्मणजे झालं, मग बाईसाहेबांचा निश्चय आहेच कीं, कुणाचीही भीड न धरतां त्यांचे बरोबर लग्न करण्याविषयीं बाबांना सांगायचं. त्यांनीं न ऐकल्यास त्या त्यांचे बरोबर शृंगापुरास जाऊन लग्न करणार.

फुली—खरंच गडे, **चंद्रकांत** महाराजांबरोबर जर लग्न होईल तर उभयतांचा रतीमदनासारखा जोडा शोभेल, व झालेली प्रीति आमरण पर्यंत कायम राहील.

चंद्रकांत—(मनाशीं)

पद.

(मना तळमळशी.)

सखे तव प्रीती ॥ खरिच कीं असे मजवरतीं॥
क्रिया सुचवीती ॥ ध्रु० ॥ मम हृदयीं उत्सुकता
उपजे ॥ सजुनि सौख्य नृपरीतीं ॥ सखे० ॥
॥ १ ॥ वनउपवनीं नगीं फिरतां शिणलों ॥
धरुनि आस तव चित्तीं ॥ सखे० ॥ २ ॥
चिंतानल अजी शांत जाहला ॥ श्रवण करु
दृढ नीती ॥ सखे० ॥ ३ ॥

असो, आतां आपणही फार विचार न करितां दासी जनांस आपलें वृत्त निवेदन करावें. प्रथमतः तृषा शांत करावी; नंतर यांना विचारावें. (पशूप्रमाणें तोंडानेंच पाणी पितो.)

गजाऊ—याकरितां बाईसाहेबांनीं किती तरी प्रयत्न केले परंतु सदा विघ्नंच येत येत गेलीं; त्यामुळं त्यांना फार वाईट वाटत होतं. आतां ईश्वर करो आणि त्यांचे हेतु पूर्ण होवेत. (चंद्रकांतास पाहून) अग बाई, हा काय चमत्कार! मनुष्य असून पशूप्रमाणं पाणी पितो!

फुली—हा कोणी तरी साधु आहे. पाहिलीसना काय बिचाऱ्याची कांती आहे!

गजाऊ—गडे, आपण त्याला विचारूं, ह्मणजे समजेल काय तें!

फुली—ठीक आहे, चल तर.

गजाऊ—(**चंद्रकांतास**) महाराज, आपण योगसाधन केलं आहे व तपतेज शरिरावर शोभतं, परंतु हातानं पाणी पिणं कां बरं सोडलं? अथवा योगसाधनामध्यें मनुष्यकृती सर्व विसरून गेलांत हें जाणण्याची माझी इच्छा आहे, आणि अशा वयांत हा योग आपण कां बरं घेतला?

चंद्रकांत—यांतील प्रकार फार निराळे आहेत. सर्वसंगपरीत्याग करून ज्या ध्यानांत मी निमग्न झालों आहें तें मला मिळाल्यावर ह्या योगाचा त्याग करीन आणि पहिल्याप्रमाणें उदकपान करीन.

फुली—ह्या जगतांत उत्पन्न होऊन योगसाधनाचाच मार्ग धरला तर असे कोणते इच्छित हेतु आहेत कीं, ज्याकरितां इतकं दुर्धर व्रत धरलं आहे?

चंद्रकांत—माझा इच्छितार्थ ईश्वरावांचून पूर्ण करणार कोणी नाहीं.

गजाऊ—हें तर खरंच! परंतु अल्पवयांतच ईश्वरावर इतकं संकट घातलं तेव्हां ही मनकामना कांहीं निराळ्या तऱ्हेची असावी.

चंद्रकांत—काय सांगूं? ज्या ध्यानांत मी सदा निमग्न आहें आणि जी माझी कामना आहे, ती कळविली असतां न जाणों कदाचित् विघ्न येईल.

फुली—महाराज, आमच्या हातून विघ्न येईल काय?

चंद्रकांत—होय, माझ्या कार्यांत कांहीं अंशी तुमचा संबंध असेल असें मला वाटतें. विशेष काय सांगूं?

गजाऊ—अग बाई, आपली आमची ओळख नाहीं, आणि आमचा संबंध कसा ?

चंद्रकांत—सांगतो ऐका ?

साकी.

प्रिय सखि तुमची दावा नयनीं गांजिली जी विरहानें ॥ चिंतेनें ही अस्थि चर्मवत् कृश तनु फिरतां रानें ॥ करुनी नेमाला ॥ भेटायाची आस मला ॥ १ ॥

गजाऊ—आपण हें असं भलतच काय बोलतां ?

चंद्रकांत—असो, आतां माझं अहित झालं तरी चिंता नाहीं, परंतु सर्व वर्तमान तुह्मांला सांगतों, तुमच्या इच्छेस वाटल्यास माझें हित करा अथवा मज गरिबाचें अहित करा.

गजाऊ—अहित आमच्या हातून कधींही होणार नाहीं, सांगावें महाराजांनीं.

चंद्रकांत—ऐका तर, सांगतों.

साकी.

चंद्रकांत मम नाम असे शृंगारपुरीचा राजा ॥ चंद्रकलेची प्राप्ती व्हावी इच्छुनि इतुक्या काजा ॥ आलों येथवरी ॥ यास्तव योगी वेष धरीं ॥ १ ॥

यापरतें माझें ईश्वराजवळ अन्य कांहीं मागणें नाहीं.

गजाऊ—(मनाशीं) अग बाई, हा काय प्रकार झाला? बाईसाहेबांप्रमाणंच ह्यांचीही स्थिति होऊन अखेर सर्वसंग परि त्याग सुद्धां केला! अहाहा! देवा, काय हा प्रेमाचा प्रकार' (फुलीस) सखे, पाहिलंस हा योगायोग कसा आला तो?

फुली—गडे, झाली ही गोष्ट चांगली झाली, पण आतां किनी आपण लौकर जाऊन त्या दुःखित कमलनीला दुःखांतून काढून भृंगास भेटवूं, म्हणजे उभयतांस जो आनंद होईल तो पाहून आपणही संतोष मानूं.

गजाऊ—महाराज, आह्मींही **चंद्रकला** बाईसाहेबांच्याच दासी आहोंत तर आपण कांहीं काळजी करूं नये. आपली आणि बाईसाहेबांची भेट करवितों.

चंद्रकांत—स्त्री पुरुषाचा संयोग केल्यास ईश्वराचे ठिकाणीं अपार पुण्यांचा ठेवा होतो, आणि तो अखंडीत सौख्यांत ठेवतो.

गजाऊ—असो महाराज आतां आमच्या बरोबर चलावं.

चंद्रकांत—फार उत्तम चला तर. (सर्व निघून जातात.)

(तदनंतर बागेंतील लतामंपांत **चंद्रकला** पल्लवशय्येवर पडलेली आहे आणि सखी जवळ बसली आहे असा पडदा उघडतो.)

मालती—सखे, ही चंदनाची उटी तुझ्या अंगाला लावते म्हणजे कांहींशी शांतता वाटेल.

चंद्रकला—(कण्हत) हे शितल उपचार करून कशाला श्रम घेतां?

मालती—मग तुझीही अशी अवस्था दिवसेंदिवस जास्त होत चालली याला काय बरं करावं ?

चंद्रकला—सर्वांत शितकार चंद्रकांत महाराज त्यांची भेट करीव म्हणजे झालं.

मालती—हो पण ते आतां इथं आहेत कां म्हणून तुला भेटतील ?

चंद्रकला—नाहींत ना मग माझी अशा सोडून द्या.

मालती—असं भलतंच नको गडे बोलूस ?

चंद्रकला—तर काय करूं ? खरोखर सखे माझे प्राण कांहीं राहणार नाहींत. एक मासाची अवधी प्राणप्रियांना दिली त्याप्रमाणं ते आले तर बरं, नाहीं तर खचीत हा प्राण ठेवणार नाहीं.

मालती—ईश्वराच्या मनांत जसं असेल तसं खरं; आपल्या हाती आहे का कांहीं ?

चंद्रकला—ह्मणूनच प्राण देणार. (स्तब्ध होते. पुनः) काय करूं.

पद.

(जाणवले विपरीत काय बोलली सीता,)

दैवा कैसे विपरितकृती पिडसी मला ॥ स्वामी वियोगें गोड न लागे पतितही झाली चंद्रकला ॥ ध्रु० ॥ रोष प्रिया काहो आणिला ध्यानीं ॥ कामज्वरें नये निद्रा शयनीं ॥ तव पदीं लक्ष ॥ शिणलें हें अक्ष ॥ साक्ष प्रभूकर आहे याला ॥ दैव० ॥ १ ॥

(इतक्यांत चंद्रकांत एका बाजूस येऊन उभा राहतो.)

चंद्रकांत—अहाहा! काय माझ्या प्रियेची अवस्था झाली! जिनें आपली तनू माझ्याकारितां अगदीं शुष्क केली. अन्नपाणी वर्ज करून अगदीं मरणोन्मुख झाली, तर आतां हिला फारवेळ दुःखांत ठेऊन उपयोग नाहीं. आणि आपणही कष्ट सहन केले आहेत तर इच्या आलिंगनसुखानें शांत होवूं. (तिच्या जवळ जाऊन) हे मनोहरिणी,

साकी.

झाली तव गती तैसें मजला व्याकुळ केलें मदनें ॥ पलपल युगसम भासे तुजविण न गमे मज शशिवदने ॥ सोडुनि गेहाला ॥ आलों सत्वर शोधाला ॥ १ ॥

मालती—आगबाई, हा कोण योगी एकाएकी जवळ येऊन भलते भलते बोलतो!

चंद्रकला—अंतकाळी माझा छळ करण्यांकारितां शृंगारपुरांतील तर योगी आला नाहीं?

चंद्रकांत—हे चारुशीले,

पद.

(राग ललत ताल त्रिवट.)

पाजी अधर सुधेला ॥ मरणोन्मुख हा झाला ॥ ध्रु०
योगी नव्हे मी चंद्रकांत नृप ॥ विरहे शुष्क त-

नूला ॥ पा० ॥ १ ॥ स्वल्प कल्प सज देई आलिं-
गन ॥ सुफलित यत्न जहाला ॥ पा० ॥ २ ॥

सखे, आतां शंका कोठवर ठेपणार ?

चंद्रकांत—शंका आहे कुठं ? (एकमेकांस आलिंगन देतात सखी निवून जातें) प्रिया काय आपल्या शरिराची अवस्था झाली, आपण मजकरितां योगीवेश घेतलात नां ?

चंद्रकांत—प्रिये,

पद.

(कधींग साळू बोलशील,)

सुदिन धन्य मानितों मी यत्न सिद्ध झाला ॥
सौख्यसिंधू मोदलहरी युक्त पूर्ण भरला ॥ ध्रु०
आस मनीं ध्यास सदा राज्य सूख त्यजिलें ॥
साधूचा वेष परी बद्ध प्रीति जालें ॥ दर्शित
हा लेख हृदयीं मारी स्मरभाले ॥ ब्रम्ह नेम-
नटळे कदा आजि योग घडला ॥ सु० ॥ १ ॥

चंद्रकला—महाराज, या चरणाच्या प्राप्तीकरितां मी रात्रंदिवस मार्गप्रतीक्षा करीत होतें. मला अन्नसुद्धां गोड लागत नसे परंतु ईश्वरानं मला आजपर्यंत केलेल्या व्रतांची साफल्यता करून दिली. प्राणप्रिया, मज पाणिग्रहणीकरितां आपण ही अनेक कष्ट सहन केले. माझ्या सारख्या हजारो स्त्रीया आपल्यास मिळाल्या असत्या, परंतु वचनाकरितां

इतके प्रकार केलेंत. असो. आतां ईश्वरांजवळ माझं हेच मागणं अहे कीं, या चरणाची सदोदीत सेवा घडावी या शिवाय कांहीं नको.

चंद्रकांत—सखे, हा योगायोग पूर्व संचितावांचून होत नाहीं. कारण, तुझी निष्कलंक प्रीती जर माझ्या ठिकाणीं नसती तर इतका प्रकार घडलाच नसतां. असो, (तिच्या हनुवटीस हात लावून) हें एक रत्न मिळल्यामुळें सर्व दुःख विसरून गेलो. प्रिये.

पद.

(किती सुंदरतरी रुप असें हे.)

जगदीशानें ब्रह्म निर्मुनी माया सुत्रीं गुंफियलें ॥ नानाविध अती रम्य वस्तुनीं मनुजा लागी सुखवीलें ॥ त्यांत थोर बहु लोभ धनाचा कैक त्यांत गुंतुन गेले ॥ अग्रेसर हें रत्न कामिना षड्रिपु स्थानचि बनवीले ॥ सुंदर वस्तू प्रिय सर्वांसी त्यापरि मन तुजवर जडले ॥ गंगोदक सम प्रेम नेम हा बघुनी सर्वस्वा त्यजीलें ॥ १ ॥

चंद्रकला—नाथ.

पद.

(काय मला भूल पडली)

पुर्व पुण्य सफल मला आजि जाहले ॥ क्षुधिता

जणु मिष्ट अन्न दैवें लाभलें ॥ ध्रु० ॥ भृंग कमल प्रेम जेवि तेवि मजवरी ॥ निशिदिनि दृढ राहो प्रीत हेतु अंतरी ॥ दीन दासी चरणांकित मानुनी खरी ॥ घडला हा योग उभय सख्य जोडले ॥ १ ॥

याकरितां या दीन अबलेचा अव्हेर करूं नका.

चंद्रकांत—सुंदरी असें कधीं होईल काय? पहा.

पद.

(परिसा रघुविर नाशति मिर.)

धूर्त चतुर मर्यादा हे गुण तव अंतरिं वसती ॥
नीरजणूं गंगेचें निर्मळ तेवि बघुन प्रीती ॥ ध्रु० ॥
परिस लोहाचा संगम होता होई कांचन ते ॥
मन्मनिं जैसे होतें तैसे घडले अति निते ॥ न
मिळे कोठें शोधुन बघतां तुज समसद्गुनिते ॥
मान्य करुनि हा विनय सदय मी जहालो
तुजवरती ॥ १ ॥

तर माझ्या हांतून (तिच्या हनुवटीस हात लावून) या आमोलिक रत्नाचा अव्हेर कधीं होणार नाहीं.

चंद्रकला—महाराज.

पद.

(राग भैरवी ताल त्रिवट.)

सुखाचा दीन मानूं आज ॥ पूर्ण मम मनचे

जहालें काज ॥ ध्रु० ॥ मद्विरहानें योगी होवुनी ॥ सजुन कुलाची लाज ॥ सु० ॥ १ ॥ वन उपवनिं बहू शीण जहाला ॥ रक्षितसे प्रभुराज ॥ सु० ॥ २ ॥ गत गोष्टी सागाव्या आतां ॥ दाशिचे शिरताज ॥ सु० ॥ ३ ॥

चंद्रकांत—सखे.

पद.

(मरताहुं तेरे हीज्रमे आयार.)

तुजलाहि झाले कष्ट बहू मद्विरह व्यथेनें ॥ नारि दुषणीय असे शास्त्र मतानें ॥ ध्रु० ॥ परी शुद्ध स्पटीक कृष्ण शिला माजि निपजला ॥ कीं काग याति मंजु भाषणीय कोकिला ॥ बहु कंटक हे केतकीस गंध मानला ॥ तेवि त्वदिय सदय हृदयें शांतलों मनें ॥ तु० ॥ १ ॥

चंद्रकला—प्रिया, या अवस्थेंत आपल्याला बहुत दुःख झालें तर आतां चला, आणि हा वेष टाकून पूर्ववत् उत्तम वस्त्रालंकार परिधान करा म्हणजे मी आपल्या पित्याला कळवून आपला विवाहाचा बेत ठरवीन.

चंद्रकांत—टीक आहे. तुझ्या इच्छेप्रमाणें कां होईना.

(असें बोलून उभयतां निघून जातात.)

(तदनंतर कमलनाभ सावकार प्रवेश करतो.)

कमलनाभ—काय करावें. मी शृंगारपूर सोडून येथें आलो. कारण—

पद.

(मी कुमार तीही कुमारी.)

मम कन्या चंद्रकलाती ॥ अविचारे करि अपकीर्ती ॥ सत्ताधिश सत्कुल नृपती ॥ ठेवि स्नेहें त्यावर प्रीती ॥ सुत जाणुनी मी इजवरती ॥ करि प्रेमा तोषा देती ॥ चाल ॥ सद्गुण तरि किति वर्णावें ॥ सुंदरता तैशी स्वभावें ॥ हेतू जरि ना पुरवावें ॥ उ० ॥ तरी मन्मन दुःखित भारी ॥ ज्या पोटिं अपत्यें असती ॥ त्या सहजचि करुणा येती ॥ १ ॥

असा प्रकार झाल्यामुळें तिने हट्टच धरिला आहे. कीं जर प्रतिबंद कराल तर मी न विचारतां निघून जाऊन त्याज बरोबर विवाह करीन. (विचार करून.) असो विधीनियम कोणाला चुकत नाहीं तेव्हां ती अपरोक्ष विवाह करणार त्यापेक्षां आपल्या समक्षच सर्व आनंद करावा म्हणजे झालें आपल्या तरी प्राक्तनी हा सोहाळा पहाणें आहे कुटें जे होईल ते होवो. लोकांनीं जरी नांवें ठेविली तरी चिंता नाहीं. असो, आतां या कृत्यास विलंब लावून उपयोग नाहीं कोण आहे रे तो.

सीपाई—(मुजरा करून) जी महाराज.

कमलनाभ—जा आणि चंद्रकलेला घेवुन ये.

सीपाई—हुकूम (मुजरा करून जातो आणि पडद्यांतून चंद्रकलेस घेवून येतो.) असे इकडून यावें (कमलनाभास मुजरा करून) महाराज, अक्कासाहेब आल्या आहेत.

चंद्रकला—(नमस्कार करून खालीं मान घालून उभी रहातें.)

कमलनाभ—(आनंदानें तीस कुरवाळून) बाळे असा संकोच धरून कां उभी राहलीस तुझ्या विषयी.

पद.

(पाहीन सिंव्हासनी राम कधी मी.)

मन्मन बहु आजि मोदीत झाले ॥ विधिनियमाते जाणुनी ॥ध्रु०॥ संसारी सुख होय स्त्रियातें प्रिय पतिसंगे जन्मवरी ॥ नगप्रावरणें तुच्छ गणीती मात पिताही तैशापरी ॥ म० ॥ १ ॥ मायाजालें बद्ध जहालो मानसि अजवरी रोष धरीला ॥ परितव नेमा तोषित होवुनी देतो अशिर्वच घ्या सौख्याला ॥ म० ॥ २ ॥

चंद्रकला—बाबा वडिलानीं मुलावर प्रेम ठेवणें हे त्याचं कर्तव्य कर्मच आहे. परंतु मी

पद.

राग बिहाग ताल त्रिवट.

अविनय वर्तन स्वमनें केले ॥ अज्ञपणें आपणा दुखविलें ॥ ध्रु० ॥ रूप गुणानी युक्त भूपती ॥

सुशिल शुद्ध मन जाणुनि चित्तीं ॥ झाले वश त्या सोडुनि रीती ॥ परि प्रेमें तुम्हि सुखि मज केलें ॥ १ ॥

या योगानें मी धन्य झालें.

कमलनाभ—असो, आतां **चंद्रकांत** महाराज, कुठें आहेत ते सांग म्हणजे त्याचा आणि तुझा विवाह करून देतो.

चंद्रकला—ते आपल्या मोतीबागेंतील बंगल्यांत आहेत.

कमलनाभ—कोण आहे रे तिकडे?

चाकर—जी, काय हुकूम आहे.

कमलनाभ—**चंद्रकांत** महाराज मोतीबागेंत बंगल्यांत आहेत त्याना घेवून ये.

चंद्रकला—बाबा त्यानीं योगीवेष घेतला होता याकरितां पोषाख देवून घेवून यायला सांगा.

कमलनाभ—बरे आहे. अरे त्याना पोषाख देवून घेवून ये.

चाकर—आज्ञे प्रमाणें घेवून येतो. (जातो)

(इतक्यांत **चंद्रकांत** येतो.)

चंद्रकांत—(**कमलनाभास**) मी आपल्या चरणीं अभिवंदन करितो.

कमलनाभ—तुमचे आखंड कल्याण असो.

चंद्रकांत—महाराज.

पद.

राग भैरवी ताळ त्रिवट.

अपराधी मी तुमचा ॥ हृद्धन हारक साचा ॥ ध्रु० ॥ नेम विधिचा न टळे कधिही ॥ कर्माधिन बुद्धी ही राही ॥ कारण दोषा जाहलो जरिही ॥ तोषित पाहुनी अंत दयेचा ॥ अप० ॥ १ ॥

कमलनाभ—असो आतां.

साकी.

उभय प्रीतही साम्य पाहुनी तोष मनीं बहु झाला ॥ वृद्धपणीं मज सुखवा आतां भोगुनिया सौख्याला ॥ उदरीं सुत नाहीं ॥ यास्तव दुःखित नरदेहीं ॥ १ ॥

चंद्रकांत—वडिलांच्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी यथास्थित होतील. त्या विषयीं काळजी नको.

कमलनाभ—बाई चंद्रकले, माझ्या समक्ष तूं आपल्या प्रिय पतिच्या कंठांत माला घाल.

चंद्रकला—ठीक आहे. (पुष्पमाला चंद्रकांताच्या गळ्यांत घालते.)

कमलनाभ—(चंद्रकलेचा हात चंद्रकांताच्या हातांत देऊन दोघांचे मस्तकावर हात ठेवून) आतां ईश्व-

राची प्रार्थना करून सुखानें संसार करा म्हणजे वृद्धपणीं मी आनंद मानीन.

(सर्व स्तुती करतात.)

पद.

राग भैरवी ताल दादरा.

पंचवदन कमल नयन नंदिवहाना ॥
चर्म वसन भस्मार्चन भाल लोचना ॥ ध्रु० ॥
वामांगी गौरि शिरीं जान्हवी धरा ॥
त्रिशुल करीं वास नगीं भक्त प्रियकरा ॥
ज्ञान ज्योति पूर्ण ब्रह्म सत्व मंदिरा ॥
वंदिताति सुर नर मुनी तव पदानना ॥पं०॥१॥
संसारीं सौख्य नसे कष्ट निशिदिनीं ॥
दास्यपणें द्रव्य लोभ हृदईं ठेउनी ॥
शिणलो बहु रंगो मति रामचंद्र ध्यानीं ॥
लक्ष्मीसुत त्रिंबक नमी पुरवि वासना ॥पं०॥२॥

समाप्त.